# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०३ मार्च, २०२० / फाल्गुन १३, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(३) गृहनिर्माण मंत्री**<br>**(४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

### तुर्भे ते खारघर या भुयारी मार्गाच्या कामाबाबत

**(१) * ५३९ श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तिसऱ्या खाडी पुलाचा मार्ग शासनाने प्रशस्त केला असून तुर्भे ते खारघर भूयारी मार्गाच्या संरेखनाचा प्राथमिक अभ्यास करण्यास प्रारंभ केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएसआरडीसी, सिडको आणि एमआयडीसी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान संयुक्त पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केलेल्या पाहणीमध्ये काय आढळून आले, त्याचे थोडक्यात स्वरूप काय, तद्नुसार भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत तुर्भे ते खारघर बोगद्यासह जोडरस्त्याच्या प्रकल्पाचा पुर्व सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी नेमलेल्या सल्लागाराने सुचवलेल्या अंतीम आखणीची पाहणी करण्यात आली असून सदर आखणीस शासन स्तरावरुन पायाभुत सुविधा समितीची मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

(४) लागु नाही.

-----------------

## मुंबईतील पायाभूत सुविधा शुल्कापोटी जमा होणाऱ्या रक्कमेबाबत

**(२) * ८५८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पायाभूत सुविधांपोटी जमा होणारी १२१ कोटी रुपयांची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबई महानगरपालिकेला जमा झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम थकविण्याची कारणे काय आहेत व सदर रक्कम मुंबई महानगरपालिकेला देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत माहे मार्च, २०१८ पर्यंत पायाभूत सुविधा शुल्का पोटी एकूण रु.९८.६० कोटी एवढी रक्कम जमा असून त्यापैकी ९०% रु.८४.७५ कोटी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे जमा करणे अपेक्षित आहे.

(२) व (३) मुंबई महानगर प्रदेशामध्ये एमएमआरडीएमार्फत बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेले मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या भांडवली खर्चापैकी रु. १६,६६४ कोटी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राधिकरणास देणे अपेक्षित आहे. तसेच एमआरटीपी कायद्यांतर्गत कलम १२४-ब पोटकलम २-१अ अन्वये जमा होणाऱ्या वाढीव विकास शुल्काची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राधिकरणास येणे अपेक्षित आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देय असलेल्या उक्त रकमेमधून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्राधिकरणाकडून देय असलेली रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राधिकरणाने विनंती केली आहे.

-----------------

## सिद्धार्थनगर गोरेगाव (पश्चिम) येथील पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(३) * ३७९७ श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिद्धार्थनगर गोरेगाव (पश्चिम) येथील पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पात विकासकामार्फत रहिवाशांना चार वर्षांचे भाडे अदा केले नसुन प्रकल्पाचे काम पूर्णपणे थांबले आहे, तसेच सदर प्रकल्प म्हाडामार्फत पूर्ण करण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडामार्फत रहिवाश्यांना मासिक भाडे अदा करण्यात येणार आहे अथवा त्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणते धोरण राबविण्यात येणार आहे याबाबतचा अहवाल शासनाने सादर केला आहे काय व सदर अहवालात काय निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पातील मूळ रहिवाशांचे पुनर्वसन होईपर्यंत सदर जमिनीवर सुरू असलेल्या खाजगी विकासकांच्या बांधकामांना म्हाडामार्फत काम थांबविण्याबाबत नोटीस देऊनसुद्धा त्याठिकाणी खाजगी विकासकांमार्फत बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१), (२) व (३) गोरेगाव सिध्दार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्था (पत्राचाळ), विकासक मे. गुरुआशिष कं.प्रा.लि. आणि म्हाडा यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा झालेला आहे. विकासकाने अटी व शर्तींचा भंग केल्याने पुनर्विकासाचा त्रिपक्षीय करारनामा रद्द करण्याबाबत व संपुर्ण प्रकल्प विक्री हिश्यासह ताब्यात घेऊन, विकासकाच्या रिस्क ॲन्ड कॉस्ट वर पूर्ण करण्यासाठी म्हाडामार्फत विकासकास दि.१२/०१/२०१८ रोजी टर्मिनेशन नोटीस जारी करण्यात आली आहे.

सदरहू विकासकाने विक्री हिश्यातील ब-याच भूखंडाचे विकास हक्क त्रयस्थ विकासकांना विकले. याबाबतचा अहवाल आर्थिक गुन्हे विभागास म्हाडातर्फे दि.१२/०३/२०१८ रोजी देण्यात आला. त्याअनुषंगाने म्हाडाने दि.१३/०३/२०१८ रोजी FIR क्र. ८५/२०१८ अन्वये विकासक मे. गुरुआशिष कन्स्ट्रक्शन कं.प्रा.लि. व त्यांचे संचालक व इतर यांचेविरुध्द आर्थिक गुन्हे विभागाकडे गुन्हा दाखल केला आहे. तसेच ९ विकासकांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.२८/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये “In the meantime, MHADA shall not take any coercive action against any of the plaintiffs in the above suits” असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने खाजगी विकासकांच्या बांधकामावर कारवाई करता आली नाही.

(४) व (५) सदर प्रकरणातील न्यायप्रविष्ट बाबी / मा.न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन या पुनर्विकास प्रकल्पाबाबत तातडीने उपाय योजना सुचविण्यासाठी श्री. जॉनी जोसेफ, सेवा निवृत्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६/०१/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये एक सदस्यीय समिती नेमली आहे.

सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय येथे प्रकल्पाशी निगडीत याचिका प्रलंबित आहेत.

-----------------

## खडकवासला (जि.पुणे) येथील रस्त्यांची कामे संथगतीने सुरु असल्याने होणारी वाहतुक कोंडी

**(४) * १३३८ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (जि.पुणे) येथील सिंहगड रस्ता, नांदेडपासून पानशेत आणि वेल्हापर्यंतच्या विविध रस्त्यांची कामे अत्यंत संथगतीने सुरु असल्यामुळे या रस्त्यांवरील विशेषतः किरकटवाडी, कोल्हेवाडी, खडकवासला, नांदोशी, गोऱ्हे आदि गावात वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजीपर्यंतची सदरहू रस्त्यांच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदरहु रस्ते पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची कामे संथगतीने सुरू असण्याची कारणे काय आहेत व त्यामुळे सदर परीसरात निर्माण होणारी वाहतुक कोंडी नियंत्रित करण्यासाठी व सदर रस्त्यांची कामे लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे,

प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीमध्ये किरकिटवाडी व खडकवासला येथे कार्यालयीन वेळेपुर्वी व कार्यालयीन वेळनंतर वाहतुक कोंडी होते.

(२) सदर रस्ता हा हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत पॅकेज क्र. पीएन २४ या पॅकेजचा भाग असून पीएन २४ या पॅकेजच्या एकूण ७६.१६ किमी पैकी २४.२२ किमी लांबीतील काम पूर्ण असून ११.४६ किमी लांबीत काम प्रगतीत आहे. तसेच किरकिटवाडी व खडकवासला गावांतील लांबी ही ११.७० किमी असून त्यापैकी ३.६५ किमी लांबीतील काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत लांबीमध्ये काम प्रगतीत असून उर्वरित काम माहे मे २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) सदरची लांबी ही शहरी भागातील असल्याने अस्तित्वातील सेवा वाहिन्या स्थलांतरीत (Utillty Shifting) करुनच काम करावयाचे असल्याने काम जलदगतीने करण्यास अडथळा येतो. तथापि, आगामी काळात कामे जलदगतीने करण्याचे नियोजन आहे. वाहतुक सुरक्षेची उपाययोजना करुन व वाहतुक नियंत्रित करुन प्रत्यक्ष काम केले जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली पूर्व (मुंबई), आकुर्ली रोड येथील महानगरपालिकेच्या प्रसूतिगृहाच्या दुरुस्तीबाबत

**(५) * ६१४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली पूर्व, आकुर्ली रोड येथील महानगरपालिकेचे प्रसूतिगृह दुरुस्तीकरिता रिकामे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे वर्षभराचा कालावधी होऊनही प्रसुतीगृहाच्या पुनर्विकासाचे काम अद्याप सुरूच झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सर्वसामान्य स्थानिक गर्भवती महिलांना त्रास सहन करावा लागत असून वारंवार तक्रारी होऊनही पुनर्विकासाची कोणतीही प्रगती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रसूतिगृहाच्या पुनर्विकास कामाला कधीपासून सुरुवात होणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आकुर्ली प्रसुतीगृहाची पुनर्बांधणी करण्यात येणाऱ्या भूखंडावर चार प्रकारचे आरक्षण असून, त्यांचा आकार असमान असल्यामुळे विकास करणे कठीण होते. त्यामुळे प्रथमत: चारही आरक्षणाची योग्य आकारात पुनर्रचना करुन, प्रसुतीगृहाच्या आराखड्यास मंजुरी देण्याचे तसेच मसुदा निविदा तयार करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) सदर प्रसुतीगृह दिनांक ०१.०९.२०१७ रोजी माता बालक रुग्णालय येथे स्थलांतरीत करण्यात आले हाते.

तद्नंतर सदर प्रसुतीगृह दिनांक ०१.११.२०१८ रोजी दामूपाडा, कांदिवली (पूर्व) येथील महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले असून तेथे प्रसूतीविषय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) सदर प्रसुतीगृहाच्या पुनर्विकासाचे काम साधारणत: ६ महिन्यानंतर सुरु होणे अपेक्षित असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील २७ गावांकरिता स्वतंत्र नगरपरिषद गठीत करण्याबाबत

**(६) * १४८७ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) क्षेत्रातून २७ गावे वगळून या गावांच्या क्षेत्राकरीता स्वतंत्र नगरपरिषद गठीत करण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्राथमिक अधिसूचना काढून प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचा अहवाल शासनास सादर करावा असे आदेश विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना दिले असतानाही अद्यापही हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन परिपूर्ण अहवाल शासनास पाठविला नसल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करणेबाबत हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन तात्काळ अहवाल शासनास सादर करुन स्वतंत्र नगरपालिका स्थापित करावी अशी मागणी दिनांक १२ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोकण आयुक्तांना अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही अद्यापपर्यंत अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अहवाल सादर करुन २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) • कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रातून २७ गावे वगळून या गावांसाठी नगरपरिषद घटीत करण्यासाठी दि.०७.०९.२०१५ रोजी प्रारूप अधिसूचनेचा मसूदा प्रसिध्द केला आहे.
• सदर २७ गावांची नगरपरिषद स्थापन करण्यासाठी प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी घेऊन अहवाल शासनास सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यात आले आहे.
• मा.लोकप्रतिनिधींनी दि.१२.१२.२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त हरकती व सूचनांवर तात्काळ सुनावणी घेऊन अहवाल शासनास सादर करण्याची मागणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे केलेली आहे.
• विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे याबाबत कार्यवाही सुरू आहे.
• विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागाने गत चार वर्षापासून मालमत्ता करनिर्धारण बंद केले असल्याबाबत

**(७) * १०४३ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार महसूल वाढीसाठी कोणत्याही मालमत्तेचे करनिर्धारण करणे अनिवार्य आहे परंतु नवी मुंबई महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागाने गत ४ वर्षापासून कोणतेही कारण न देता मालमत्ता करनिर्धारण बंद केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महानगरपालिकेचे चार वर्षांत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे गावठाणे, झोपडपट्टीतील घरे खरेदी-विक्री करण्यात अडचणी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मालमत्ता करनिर्धारण बंद करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, यास जबाबदार असणा-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) • महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १२७ व १२९ अन्वये तसेच प्रकरण ८ मधील कराधान नियमातील तरतूदीनुसार महापालिका हद्दीतील जमीन व इमारतींवर मालमत्ता कर आकारणी करण्यात येत असून, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता करनिर्धारण बंद करण्यात आलेले नाही.

• सन २०१६ ते जानेवारी, २०२० या कालावधीत एकूण ११४७६ मालमत्तांचे करनिर्धारण केले असून, एकूण रू. २७१५.१७ कोटी इतका मालमत्ता कर वसुल झाला, ही वस्तुस्थिती आहे.

• महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने वितरीत केलेले भोगवटा प्रमाणपत्र व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वितरीत केलेल्या बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्यानुसार मालमत्ताधारकाने सादर केलेला अर्ज/कागदपत्रे तपासून मालमत्ता करनिर्धारण करण्यात येते.

• नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील गावठाण तसेच झोपडपट्टी विभागातील भोगवटादाराच्या नावात बदल करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने सन २००४ मध्ये कार्यपध्दती विहीत केली होती. त्यामध्ये सन २०१७ मध्ये सुधारणा करून नोंदणीकृत खरेदीखत घेणे अनिवार्य केले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# गोवंडी (मुंबई) येथील शताब्दी रुग्णालयातील रक्तपेढीचे महानगरपालिकेसोबतचे कंत्राट संपुष्टात आले असतानाही रक्तपेढी सुरु असल्याबाबत

**(८) * ३१४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील शताब्दी रुग्णालयात पल्लवी रक्तपेढीकडून पीपीपी तत्वावर केवळ एक रुपये भाडेतत्वावर रक्तपेढी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्तपेढीचे महानगरपालिकेसोबतचे कंत्राट माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये संपुष्टात आले असतानाही ही रक्तपेढी अद्यापही सुरु असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रक्तपेढीचा अधिकाधिक लाभ महानगरपालिकेच्या रुग्णांना न होता खासगी पध्दतीने रक्ताची विक्री होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीनूसार रक्तपेढीचे कंत्राट संपले असतानाही खासगी पध्दतीने रक्ताची विक्री करणा-या पल्लवी रक्तपेढीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयातील पल्लवी रक्तपेढी महापालिकेच्या दिनांक २१.०६.२०१२ रोजीच्या ठरावानुसार सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत केवळ एक रुपये भाडेतत्वावर दिनांक २३.०३.२०१४ पासून सुरु आहे.

(२) पल्लवी रक्तपेढीचा कंत्राट कालावधी माहे जुलै २०१८ मध्ये संपुष्टात आला असून, सदर रुग्णालयातील रुग्णसेवा बाधीत होऊ नये याकरिता सदर रक्तपेढी सुरु ठेवण्यात आली आहे.

तसेच, सदर रक्तपेढीच्या नुतनीकरणाबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(३) व (४) “रक्तपेढीचा खिसेकापू कारभार” अशा आशयाची बातमी दिनांक ०३ जानेवारी, २०२० रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर रक्तपेढीद्वारे आकारण्यात येणारे शुल्क हे महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या नियंत्रण व निर्देशानुसार आकारण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईतील मांडवी विभाग 'बी' प्रभाग येथील मित्तल एलिगंट या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(९) * १७१९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील मांडवी विभाग ‘बी’ प्रभाग येथील सी.एस.क्र.१३/१७२१ येथे एम.एम.आयडियल इन्फ्रामार्फत राबविला जाणारा मित्तल एलिगंट हा पुनर्विकास प्रकल्प कराराप्रमाणे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्यापपर्यंत तो अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील सुमारे ५० टक्के मूळ रहिवाश्यांना कराराप्रमाणे देय असलेली भाड्याची रक्कम विकासकाने गत दीड वर्षापासून दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर थकीत भाडे रक्कम व्याजासह मूळ रहिवाश्यांना विकासकाने अदा करण्यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे तसेच सदर प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण करण्यास विलंब झाल्याप्रकरणी शासनाने नियमाप्रमाणे विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) दक्षिण मुंबईतील "बी" विभागातील मांडवी डिव्हीजन येथील सी.एस. क्रमांक १३/१७२१ या भूखंडावरील "सम्स बिल्डींग" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेचे भाडेकरु असलेल्या मालमत्तेचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये प्रस्तावित आहे.

सदर मालमत्तेचा पुनर्विकास करण्यास "सम्स बिल्डींग" मधील रहिवाशांमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या विकासकास दिनांक ०४.०५.२०१३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर विकासकास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८.१०.२०१८ रोजी पूर्ण बांधकाम (तळमजला + २१ अंशत: मजले) परवाना प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर प्रकल्प दिनांक ०४.१२.२०१८ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते.

सद्य:स्थितीत सदर इमारतीचे तळमजला + २० मजल्यांचे बांधकाम झाले आहे.

सदर इमारतीचे बांधकाम अद्यापि पूर्ण झाले नसल्याने भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

(३) व (४) पुनर्विकासात असलेल्या इमारतीच्या सभासदांचे थकीत भाडे व अर्धवट काम थांबल्याबाबत मूळ रहिवाशांनी दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी तक्रार दाखल केली आहे.

तथापि, इरादापत्रातील अटींचे पालन करणे हे विकासकास बंधनकारक आहे. सदर अटींनुसार थकीत भाडे देण्याची जबाबदारी ही संस्था/विकासक यांची आहे.

त्यानुसार सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, विकासकास भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार विकासकावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील नेरी-गांगलवाडी, किटाळी-मोटेगाव व पळसगाव-तोरगाव या रस्त्यांच्या हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल अंतर्गत सुरु असलेल्या बांधकामाबाबत

**(१०) * ११३२ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील हायब्रीड ॲन्यूइटी मॉडेल अंतर्गत सुरु असलेली प्रमुख जिल्हा मार्ग व राष्ट्रीय महामार्गाच्या कामामध्ये प्रामुख्याने नेरी-गांगलवाडी, किटाळी-मोटेगाव, पळसगाव-तोरगाव या रस्त्यांची कामे प्रत्यक्षात सुरु होण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पैकी नेरी-गांगलवाडी, किटाळी-मोटेगाव, पळसगाव-तोरगाव या रस्त्यांच्या कामासाठी आवश्यक ट्री-व्हॅल्युएशन रीपोर्ट नुसार वन विभागाची मंजूरी, विद्‌युत खांबांचे स्थलांतरण इत्यादी मान्यता न मिळाल्याने प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय कार्यवाहीस विलंब होत असल्यामुळे विकास कामे प्रभावित होऊन अपूर्ण बांधकामांमुळे ग्रामीण भागात अपघाताचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रलंबित रस्त्यांची कामे पुर्ण करण्याबाबत तसेच ग्रामीण भागातील लहान रस्त्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने पर्यायी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) नाही.

(२) सदर पॅकेजमधील तिन्ही रस्त्यांमध्ये बाधीत होत असलेल्या झाडांचे मुल्यांकन करुन वृक्ष कटाईसाठी परवानगी घेण्याकरिता पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच सदर पॅकेजमधील विद्युत खांबांचे स्थानांतराचे तीन अंदाजपत्रके महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळामार्फत तांत्रिक मान्यता मिळाली असून उर्वरित पाच अंदाजपत्रकेकरिता पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) नाही.

(४) उद्योजकातर्फे सुरु करण्यात आलेले काम वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करुन सुरक्षित पातळीत आणण्यांत आले आहे. तसेच सदर रस्त्यावर अपूर्ण बांधकामामुळे अपघात झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई सिडको हद्दीतील तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नागरी वसाहत तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होण्याबाबत

**(११) * २७० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको हद्दीतील तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) वसाहतीमध्ये अनेक महिन्यांपासून अनियमित व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांना दैनंदिन कामात अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसाहतीतील नागरिकांनी अनियमित व कमी दाबाने होत असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत सिडको प्रशासनाविरोधात मोर्चाही काढला होता तसेच अनेक गृहनिर्माण संस्थांनी विधानसभा निवडणूकीपूर्वी इमारतीवर नो वॉटर नो वोट अशा प्रकारचे फलक लावून संताप व्यक्त केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील औद्योगिक वसाहतीत असलेले अनेक कारखाने पाण्याअभावी बंद पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तळोजा येथील नागरी वसाहती तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

नवी मुंबईमधील तळोजा रहिवासी वसाहतीला करण्यात येणारा पाणीपुरवठा हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तळोजा औद्योगिक क्षेत्राच्या पाणीपुरवठा वितरण प्रणाली मधून करण्यात येतो. सद्यस्थितीत, तळोजा रहिवासी वसाहतीतील लोकसंख्येला अंदाजे ६ द.ल.ली.प्र.दि. पाणी पुरवठ्याची आवश्यकता आहे. सिडकोच्या निवासी वसाहतीमध्ये वाढ झाल्यामुळे वाढीव आकाराच्या नळजोडणीच्या अनुषंगाने सुमारे ८ द.ल.ली.प्र.दि. पाणी पुरवठाकरिता ४०० मि.मी. व्यासाची नळजोडणी मंजुर करण्यात आलेली आहे.

तथापि, राष्ट्रीय हरित लवादाने त्यांचे दि.०३.०९.२०१९ च्या आदेशानुसार संयुक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्राला (सी.ई.टी.पी.) औद्योगिक विकास महामंडळाने अंदाजे ३० ते ३५ टक्के पाण्याची कपात केल्याने त्याचा परिणाम नागरी वसाहतीच्या पाणीपुरवठ्यावर ही झालेला आहे. तसेच नागरी वसाहतीसाठीचे औद्योगिक वसाहतीतील नळजोडणी ठिकाण ते सिडको निवासी क्षेत्र हे अंतर सुमारे ४ ते ५ कि.मी. असल्याने पाणी पुरवठा कमी दाबाने होतो.

(३) हे खरे नाही.

राष्ट्रीय हरित लवाद यांनी त्यांचे दि.०३.०९.२०१९ आदेशान्वये औद्योगिक वसाहतीतील संयुक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्राला (सी.ई.टी.पी.) फक्त १० द.ल.ली.प्र.दि. सांडपाणी घेण्याबाबत मर्यादा घालण्यात आली होती. त्यानुसार सांडपाणी निर्माण करणा-या कंपन्यांना दि.०६.०९.२०१९ रोजी पाणी कपातीच्या नोटीसा देऊन दि.०७.०९.२०१९ ते दि.२४.१०.२०१९ या कालावधीत पाणी कपात करण्यात आलेली होती.

(४) तळोजा वसाहतींना पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध नसल्यामुळे वितरण व्यवस्थेमध्ये बदल करुन तसेच झोनिंग करुन १ दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले होते आणि नजिकच्या खारघर सेक्टर २६ येथील जलकुंभातून देखील पाणी पुरवठा करण्यात आला होता.

तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२१.१०.२०१९ रोजीच्या आदेशानुसार औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांची पाणी कपात रद्द करुन दि.२४.१०.२०१९ पासून औद्योगिक क्षेत्रातील व नागरी वसाहतीतील पाणीपुरवठा सुरळीतपणे चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील कमळापूर ते रामापूर या दोन गावांना जोडणाऱ्या येरळा नदीवरील पूलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) * १५५१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या महापूरामुळे सांगली जिल्ह्यातील कमळापूर ते रामापूर या दोन गावांना जोडणारा येरळा नदीवरील पूल वाहून गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात विद्यार्थ्यासह एक व्यक्ती वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची वाहतूक बंद असुन, पूलाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिकांनी वारंवार करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाची पाहणी करुन पूलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. प्रश्नांकीत पुलावर पुर काळामध्ये नदीच्या दोन्ही बाजुस बॅरीकोड लावुन, माहितीफलक, इशारा फलक लावुन वाहतुक बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे कोणतीही जिवितहानी झालेली नाही.

(३) पुर ओसरताच पुलाची पाहणी करण्यात आली असून पुरहानी कार्यक्रमाअंतर्गत तात्पुरती दुरुस्ती करुन वाहतुक सुरु करण्यात आली आहे.

(४) सदर पुलाच्या (फरशी पुल) क्षतिग्रस्त भागाच्या दुरुस्तीसाठी कमकुवत पुल दुरुस्ती कार्याक्रमांतर्गत निधी मंजूर असून कामाच्या निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण करुन पुलाचे उर्वरीत दुरुस्ती काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) शास्त्रीनगर रुग्णालयाची आरोग्यसेवा बंद पडत आल्याबाबत

**(१३) * १२१२ श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) डोंबिवली येथील शास्त्रीनगर रुग्णालयाची आरोग्यसेवा बंद पडत आली असुन १२० खाटांच्या या रुग्णालयावर किमान ३०० रुग्णांचा भार पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात चार स्त्रीरोगतज्ञ, दोन बालरोग तज्ञ, दोन भूलतज्ञ, दोन सर्जन अशा डॉक्टरांची तातडीने आवश्यकता आहे परंतु कमी वेतन व जास्त काम यामुळे नवीन डॉक्टर्स या रुग्णालयात येण्यास इच्छुक नसल्याने प्रशासनाने किमान ठोक वेतनावर त्वरीत डॉक्टरांची नियुक्ती करावी तसेच इतरही आवश्यक सोयी सुविधा पुरविण्याबाबत या रुग्णांलयाचे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी हे पाठपुरावा करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विलंब होत असल्याने रुग्णांची प्रामुख्याने सुतिकागृहातील माता-बाल रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) • डोंबिवली येथील शास्त्रीनगर रूग्णालय हे १२० बेड क्षमतेचे असून या रूग्णालयात ६० ते ७० रूग्णांवर अंतररूग्ण विभागात उपचार करण्यात येतात. तसेच प्रतिदिन सरासरी ७०० ते ७५० बाह्यरूग्णांवर उपचार करण्यात येतात.
• त्यामुळे सदर रूग्णालयाची आरोग्यसेवा बंद पडत आली, अशी वस्तुस्थिती नाही.
(२) • शास्त्रीनगर रूग्णालयात सद्यस्थितीत स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ-१, बालरोगतज्ञ-१ व भुलतज्ञ-१ असे वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून त्यांचेमार्फत रूग्णांना सेवा दिली जाते.
• शास्त्रीनगर रूग्णालयासह इतर रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी / तज्ञांची पदे भरण्यासाठी नोव्हेंबर, २०१५ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि अपेक्षित प्रतिसाद न लाभल्याने बरीच पदे रिक्त आहेत.
• सद्यस्थितीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची काही पदे ठोक मानधनावर भरली असून त्यांचेमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
(३) व (४) • सुतिकागृहाची इमारत अतिधोकादायक झाल्याने माहे ऑक्टोबर, २०१३ पासून सुतिकागृह बंद करण्यात आले आहे. सद्या या सुविधा शास्त्रीनगर रूग्णालयात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
• तसेच डोंबिवली (पूर्व) भागात मंजूनाथ व पाटकर या दोन नागरी केंद्रात लसीकरण व गरोदर माता नांव नोंदणीची सोय करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणेसह राज्यात 'नागरी जमीन कमाल धारणा' कायद्यांतर्गत दुर्बल घटकांसाठी उपलब्ध होणाऱ्या सदनिका विकासकांच्या ताब्यात असल्याबाबत

**(१४) * ५८६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणेसह राज्यात, 'नागरी जमीन कमाल धारणा' कायद्यांतर्गत दुर्बल घटकांसाठी उपलब्ध होणाऱ्या सुमारे ८,५०० सदनिका अद्यापपर्यंत विकासकांच्या ताब्यात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, युएलसी कायदा सन २००० मध्ये रद्द झाल्यानंतर या कायद्यांतर्गत असलेले १६ हजार भूखंड ताब्यात घेऊन त्यावर दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्यात यावीत असा मा.उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने आदेश दिल्यानंतरही सदरहू भूखंड ताब्यात घेण्याच्या दृष्टीने अद्याप शासनाने कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त विकासकाच्या ताब्यातील ८,५०० सदनिका आणि मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १६ हजार भूखंड ताब्यात घेणेबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१), (२) व (३) राज्य शासनाने नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ हा दि.२९.११.२००७ रोजी स्विकारला असून उक्त अधिनियमानुसार कलम २० अन्वये मंजुर केलेल्या योजना व कलम १०(३)/ १०(५) नुसार ताब्यात घेतलेल्या जमिनींना संरक्षण प्राप्त आहे.

परंतु, नाजकधा निरसन अधिनियमानुसार कलम २० च्या वैधतेबाबत महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसींग इंडस्ट्रीज व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर रिट याचिका क्र.९८७२/२०१० दाखल केली होती. उक्त याचिकेमध्ये मा.न्यायालयाने कलम २० खालील योजनेच्या अटी व शर्ती योजनाधारकांवर बंधनकारक असल्याचा दिलेला निर्णय, विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित झाला होता. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१०.११.२०१४ रोजी योजनाधारकांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होईल, अशी कारवाई (Coercive action) करु नये असे आदेश दिले होते. मा.न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर योजनाधारकाकडून योजनेखालील क्षेत्रांचा विकास होत नव्हता.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दि.२.७.२०१९ अन्वये द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेला अहवाल, त्याबाबतची शासनाची भुमिका व

Consent Terms मा.सर्वोच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लीकेशनद्वारे दाखल करण्यात आला. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०२.०७.२०१९ रोजी व्दिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यास अनुमती दिल्याने शासन निर्णय दि.१.८.२०१९ नुसार कलम २० खालील योजनांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार अधिमूल्याचा भरणा करुन योजनेखालील क्षेत्र रहिवास प्रयोजनार्थ विकासास अनुज्ञेय केलेले असून कमी आकारमानाच्या सदनिका ठेवण्याचे बंधन घालून गृहबांधणीस प्रोत्साहन दिलेले आहे. ज्या विकासकांना कलम २० च्या अटी / शर्तीनुसार योजना पुर्ण करावयाची असेल तर सदर विकासकांना त्यानुसार योजना पूर्णत्वास नेणेस प्रत्यवाय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ शहरातील अमृत अभियान योजनेला अद्यापही तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याबाबत

**(१५) * ५४१ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील अमृत योजनेच्या पहिल्या टप्प्यातील पाणीपुरवठा योजनेच्या कामाची मुदत माहे डिसेंबर, २०१९ अखेरीस संपली तरी नाशिकचे मुख्य अभियंता तसेच शासनाकडून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासन कोणती कारवाई करणार वा करित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत भुसावळ शहरास रुपये ९०.८४ कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या मूळ संकल्पनानुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून, मूळ कार्यादेशानुसार सदर कामाची मुदत ऑक्टोबर २०१९ अखेर संपलेली आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत ३७ टक्के इतके काम झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) • अमृत अभियानांतर्गत भुसावळ पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवाचे सुधारित ठिकाण निश्चित करण्याबाबत यापूर्वी वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या असून त्यानुसार आता उद्भवाचे सुधारित ठिकाण निश्चित करण्यात आलेले आहे.

• उद्भवाच्या ठिकाणात झालेल्या बदलानुसार संकल्पनामध्ये सुधारणा करून त्यानुसार सुधारित तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

• सुधारित संकल्पनानुसार तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल व प्रकल्पाचे काम मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे भुसावळ नगर परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसवर व बसस्थानकांमध्ये करण्यात येणाऱ्या जाहिरातींबाबत

**(१६) * ५३४८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांच्या जाहिराती राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसवर तसेच बसस्थानकांवर प्रदर्शित करण्याबाबतचा बनावट अहवाल व प्रमाणपत्रे सादर करुन मे.श्री.ओम ॲडर्व्हटायझिंग प्रायव्हेट लि.मुंबई व मे.राकेश ॲडव्हरटायझींग प्रायव्हेट लि.मुंबई यांनी देयकाची

रक्कम घेतली याबाबतची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तसेच संबंधित विभागाकडे दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.राकेश ॲडर्व्हटायझींग प्रायव्हेट लि.मुंबई यांना राज्य परिवहन महामंडळांच्या बसेसवर व मे.श्री.ओम ॲडर्व्हरटायझींग प्रायव्हेट लि.मुंबई यांना बसस्थानकांवर जाहिरात प्रदर्शन करण्यास सन २०१८-१९ या वर्षाकरिता देण्यात आलेल्या परवानगीच्या अनुषंगाने जाहिरात पदर्शित करण्याबाबतची बनावट कागदपत्रे व प्रमाणपत्रे दर्शवून गैरव्यवहार केल्याचे उपमुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्या अहवालात सिध्द झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबंधात दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मे.राकेश ॲडव्हरटाईजिंग प्रा.लि. यांची आणि बसस्थानकांवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मे.श्री.ओम ॲडव्हरटायजिंग यांची निविदा प्रक्रिया राबवून निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाने विविध जाहिराती प्रसिध्द करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करुन त्याअन्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जानेवारी २०१९ मध्ये कार्यादेश दिलेले होते. यासंदर्भातील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प. महामंडळ यांचेमार्फत चौकशी केली असता, या संस्थांनी बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार या संस्थांवर पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील पामबीच मार्गावरील एनआरआय कॉम्प्लेक्स नजीकच्या भूखंडावरील तिवरांच्या झाडांची झालेली तोड

**(१७) * २७३४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील पामबीच मार्गावरील एनआरआय कॉम्प्लेक्स जवळचा सुमारे १५.५ हेक्टरचा भूखंड सिडकोने गोल्फ कोर्स आणि १७ निवासी इमारती बांधण्यासाठी एका विकासकाला दिलेला आहे. सदर भूखंडावरील तिवरांचे जंगल तोडले जाऊ नये यासाठी पर्यावरण प्रेमींनी सन २०१३ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहीत याचिका दाखल केली असता या याचिकेवर सुनावणी सुरु असतांना मा.उच्च न्यायालयाने या प्रकल्पाला आणि भूखंडावरील तिवरांची झाडे तोडण्यास स्थागिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पामबीच लगतच्या सदर वादग्रस्त भूखंडावरील ७०० तिवारांची झाडे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करुन दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी सुट्टीचा फायदा घेत ऑटोमॅटिक कटरने तोडून मिस्त्री कन्ट्रक्शनने सदरहू जागा संपादित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन विकासकाने बेकायदेशीर ७०० तिवरांच्या झाडांची तोड केल्याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सिडकोने महाराष्ट्र ॲडव्हान्टेज प्रकल्पांतर्गत नवी मुंबईमध्ये नेरुळ येथे एक गोल्फकोर्स प्रस्तावित केले असून त्यातील एकूण ५ भूखंडापैकी ३ भूखंड गोल्फकोर्ससाठी तर उर्वरित २ भूखंड रहिवास प्रयोजनासाठी निश्चित करण्यात आले आहेत. मा.उच्च न्यायालयाने गोल्फकोर्स विकसित करण्याकरिता निर्धारित केलेल्या ३ भूखंडापैकी २ भूखंड विकसित करण्यास

स्थगिती दिली होती. मात्र सदर आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१९.०७.२०१९ रोजीच्या आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर वादग्रस्त भूखंडावरील ७०० तिवारांची झाडे तोडण्याबाबत सिडको महामंडळाकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. परंतू रहिवास प्रयोनाकरीता विकसित करण्यात येत असलेल्या २ भूखंडावरील सुबाभुळ, काटेबाभुळ इ.झाडे तोडण्यास सिडकोकडून विहित कार्यपद्धतीनुसार परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेचा ब्रिमस्टोवॅड प्रकल्प रखडल्याबाबत

**(१८) * ३३८६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने पावसाच्या पाण्याचा वेगाने निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या बदलण्याचा ब्रिमस्टोवॅड प्रकल्प सुरु करुन एकूण तेरा वर्षे झाली तरी या प्रकल्पातील ५८ पैकी केवळ २६ कामेच पूर्ण झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी केलेल्या नियोजनात यावर्षी १८० ठिकाणी पाणी तुंबण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती तथापि कुर्ला, चांदिवली, घाटकोपर, अंधेरी, गोरेगावसह ज्या भागात उपाययोजना केल्या त्या भागातच यावर्षीच्या जुलै महिन्यात झालेल्या पावसानंतर पुन्हा पाणी तुंबले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नालेसफाईच्या कामासाठी महानगरपालिका दरवर्षी ५० ते ७० कोटी रुपये खर्च करत असताना नालेसफाई केल्यानंतरही त्या भागात पाणी तुंबण्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच वारंवार पाणी तुंबण्याच्या घटनांमुळे लोकांना होणाऱ्या त्रासापासून सुटका करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ब्रिमस्टोवॅड बृहत आराखड्याच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण ५८ प्राधान्याची कामे हाती घेण्यात आली असून, त्यापैकी २८ कामे पूर्ण झाली असून, २७ कामे प्रगतीपथावर आहेत व ३ कामे अद्याप सुरु झाली नसल्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सन २०१९ पर्यंत मुंबईत एकूण ३३६ ठिकाणी पूरप्रवण परिस्थिती आढळून आली, त्यापैकी -
• २२० ठिकाणी पूरपरिस्थिती नियंत्रित करण्यासाठी हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
• ५७ पूरप्रवण ठिकाणांची कामे सन २०२० च्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येणार आहेत.
• १६ पूरप्रवण ठिकाणांची कामे सन २०२० च्या पावसाळ्यानंतर पूर्ण करण्यात येणार आहेत.
• उर्वरित पूरप्रवण ठिकाणांची कामे नियोजन पथावर आहेत.

तसेच, कुर्ला, चांदिवली, घाटकोपर, अंधेरी, गोरेगांव मधील सखल भागात भरतीच्या वेळी आलेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा होण्यास विलंब झाला होता.

तथापि, भरतीची वेळ संपल्यानंतर सदर ठिकाणी पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने झाला असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दरवर्षी मोठे व छोटे नाले, रस्त्यालगतची गटारे यांच्या साफसफाईची कामे स्वतंत्र कंत्राटदाराची नेमणुक करुन करण्यात येतात.

नालेसफाई व्यवस्थित केल्यानंतरही काही सखल भागात भरतीच्या वेळी अतिवृष्टी झाल्यावर पाणी तुंबण्याच्या घटना घडतात ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, भरतीची वेळ संपल्यावर पाण्याचा निचरा जलदगतीने होतो. तसेच भरतीच्या वेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे सखल भागात पाण्याचा निचरा करण्याकरिता उदंचन संचाची व्यवस्था करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मुंबईत वारंवार पाणी तुंबण्याच्या समस्येपासून सुटका करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

• ब्रिमस्टोवॅड बृहत आराखड्याच्या शिफारशीनुसार नाल्यांच्या रुंदीकरणाची व खोलीकरणाची कामे.

• नाल्यांच्या पातमुखांशी प्रस्तावित केलेल्या पर्जन्य जल उदंचन केंद्रांपैकी ६ पर्जन्य जल उदंचन केंद्रे कार्यान्वित झाली आहेत.

• उर्वरित २ पर्जन्य जल उदंचन केंद्रांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता सल्लागार नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच सदर उदंचन केंद्रांसाठीच्या जागा महानगरपालिकेस हस्तांतर करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गालगत मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरुन शेतपिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१९) * ४६९६ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गालगत मेहकर तालुक्यातील (जि.बुलढाणा) बेलगाव, अंजनी बु., आंध्रुड व उमरा देशमुख येथील शेतकऱ्यांच्या शेतात सर्वीस मार्गामुळे पाणी अडून ते पाणी शेतात शिरत असल्याने शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान भरपाई देण्याबाबत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व तद्नुसार शासनाने सर्वीस रोडचे पाणी शेतक-यांच्या शेतात शिरु नये याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीतांना नुकसान भरपाई देणेबाबत संबंधीत ठेकेदारास सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार ठेकेदाराने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांशी संपर्क करुन समन्वयाने परस्पर नुकसान भरपाई मुद्दा निकाली काढला आहे.

तसेच या बाबत कंत्राटदाराला सूचना देऊन वेळोवेळी रस्त्यावरचे पाणी नाली काढून निचरा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच समृध्दी महामार्गाच्या रस्त्याच्या हद्दीमधून पावसाच्या पाण्याच्या निचरा करण्यासाठी कायमस्वरुपी नाल्या तयार करण्यात येत आहेत. जेणे करुन सर्वीसरोडचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात जाणार नाही व शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या जल व मलनि:स्सारण विभागाची कर तसेच जलमापके भाड्यापोटीची विविध प्राधिकरणांकडे असलेली थकबाकी

**(२०) * ८७३ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या जल व मलनि:स्सारण विभागाची कर तसेच जलमापके भाडयापोटी केंद्र शासन, राज्य शासन, म्हाडा, रेल्वे व विविध प्राधिकरणांकडे दिनांक ३० जून, २०१९ पर्यत सुमारे २,१९१ कोटी ९९ लाख रुपयांची थकबाकी असल्याचे नुकतेच माहे जाने, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदरहू थकबाकी तात्काळ देणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल व मलनि:सारण आकार तसेच जलमापके भाड्यापोटी केंद्र शासन, राज्य शासन, म्हाडा, रेल्वे व विविध प्राधिकरणे तसेच खाजगी जलजोडणीधारक यांचेकडे दिनांक ३० जून, २०१९ पर्यंत सुमारे २,१९१ कोटी ९९ लाख इतकी थकबाकी असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) सदर थकबाकी प्रकरणी संबंधित प्राधिकरणांकडे पत्र व्यवहार करण्यात आला आहे. तसेच खाजगी जलजोडणी धारकांकडून थकबाकी वसुलीची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

तसेच थकबाकीची वसुली मोठ्या प्रमाणात होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० ते दिनांक १५ मे, २०२० या कालावधीत "अभय योजना" सुरू केली आहे.

सदर योजनेमध्ये थकीत जलदेयकांमधील जल आकार, मलनि:सारण आकार, जलमापक भाडे एकरकमी भरल्यास जलदेयकामधील संपूर्ण अतिरिक्त आकाराची रक्कमेची सूट देण्यात येणार आहे.

-----------------

## पश्चिम उपनगरातील (मुंबई) भगवती रुग्णालयाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२१) * ५३६ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील आरोग्य सेवेची भिस्त असलेल्या हरीलाल भगवती रुग्णालयासाठी दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये ३० ते ४० टक्के वाढीव तरतूद करूनही मुख्य इमारतीचे बांधकाम सुरू झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भगवती रुग्णालयाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला होता त्यानुसार संपूर्ण रुग्णालयाची इमारत पाडून एक हजार खाटाचे अत्याधुनिक मुख्य रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याच्या प्रस्तावाला सन २००९ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल, २०१४ ते जुलै, २०१९ या पाच वर्षांच्या काळातील आर्थिक व्यवहाराचे कॅगने लेखापरीक्षण करून महानगरपालिकेकडे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिदक्षता विभाग सुरू करण्यासाठी खरेदी केलेल्या सुमारे ४२ लाख रुपयांची यंत्रसामग्री, २२ लाख रुपयांचे फर्निचर तीन वर्षांपासून विनावापर पडून आहेत. तसेच ७५ टक्के वैद्यकीय आणि निम्नवैद्यकीय जागा रिक्त असल्याने अतिदक्षता विभागासह अनेक विभाग सुरु केले नसल्याची बाब कॅगच्या अहवालात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागील तीन वर्षांच्या खर्चाच्या तुलनेत पुढील वर्षाची आर्थिक तरतूद केली जाते मात्र महानगरपालिकेने नियमांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भगवती रुग्णालय मुख्य इमारत व वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम विलंबाने सुरू होणे तसेच तीन वर्षांच्या खर्चाच्या तुलनेत पुढील वर्षाची आर्थिक तरतूद करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने या नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) "कोट्यवधींचा खर्च; तरीही 'भगवती' अपूर्णच" अशा आशयाची बातमी दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी "लोकसत्ता" या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) भगवती रुग्णालयाची संपूर्ण इमारत पाडून त्या जागेवर पहिल्या टप्प्यात नर्सिंग ट्रेनिंग सेंटर व दुसऱ्या टप्प्यात एक हजार खाटांचे अत्याधुनिक मुख्य रुग्णालय बांधण्याच्या प्रस्तावाला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १५.०४.२००९ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती.

त्यानुसार पहिल्या टप्प्यातील नर्सिंग ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीचे बांधकाम निविदा प्रक्रिया राबवून सन २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले.

तद्नंतर पूर्व व पश्चिम उपनगरातील महापालिका रुग्णालयांच्या पुनर्विकास प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये दुसऱ्या टप्प्यातील ३७८ सर्वसामान्य व सुपरस्पेशालिटी विभागाच्या ११२ रुग्णशय्यांची अशा एकूण ४९० रुग्णशय्या असलेले सुसज्ज व अद्ययावत रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच, भगवती रुग्णालयाची जुनी इमारत संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार धोकादायक घोषित केल्यामुळे, सदर रुग्णालयातील सेवा-सुविधा दिनांक ०४.१०.२०१३ पासून कांदिवली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात स्थानांतरीत करण्यात आल्या आहेत.

तसेच, वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता भारतीय वैद्यक परिषदेच्या निकषानुसार रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर ३ वर्षांनी अर्हता पात्र ठरेल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) माहे एप्रिल, २०१४ ते जुलै, २०१९ या कालावधीतील भगवती रुग्णालयाचे लेखा परीक्षण झाले असून, त्याबाबतचा अहवाल दिनांक २२.०८.२०१९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस कॅगमार्फत प्राप्त झाला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) भगवती रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात बांधण्यात आलेल्या ११० रुग्णशय्या असलेल्या नर्सिंग ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीमधील विविध विभागांमध्ये वापरासाठी आवश्यक असलेली यंत्रे, संयंत्रे व फर्निचर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खरेदी करण्यात आली आहेत.

सद्य:स्थितीत नर्सिंग ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीमधील अतिदक्षता विभागासाठी खरेदी करण्यात आलेले १० नग फाऊलर आय.सी.यु. बेड व आवश्यक फर्निचर वगळता इतर यंत्रे, संयंत्रे व फर्निचर उर्वरित विभागांमध्ये वापरात आहेत.

परंतु सदर रुग्णालयातील वैद्यकीय व निम्नवैद्यकीय कर्मचारीवर्ग अपुरा असल्यामुळे तेथे अतिदक्षता विभाग सुरु करण्यास विलंब झाला होता ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, धोकादायक स्थितीत असलेल्या गोरेगांव येथील सिध्दार्थ रुग्णालयातील वैद्यकीय व निम्नवैद्यकीय कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी भगवती रुग्णालयात स्थानांतरीत करण्यात आले असून, भगवती रुग्णालयातील अतिदक्षता विभाग माहे मार्च २०२० पर्यंत सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५), (६) व (७) भगवती रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात तळमजला + ११ मजल्यांच्या नर्सिंग ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीमध्ये ११० रुग्णशय्येचा वैद्यकीय विभाग जुलै, २०१६ पासून तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्यात आला आहे.

तसेच, दुसऱ्या टप्प्यात तळमजला + आठ मजली इमारतीमध्ये रुग्णशय्येचे अत्याधुनिक उच्चस्तरीय रुग्णालय अतिविशेष सेवांसह रुग्णालय सुरु करण्यात येणार असून, सदर कामाचा कार्यादेश दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९ रोजी देण्यात आला आहे.

सदर कामाचा कालावधी ३ वर्षे इतका आहे.

दुसऱ्या टप्प्यातील सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतीमध्ये, नर्सिंग ट्रेनिंग सेंटरमध्ये तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्यात आलेला वैद्यकीय विभाग स्थलांतरीत करण्यात येणार आहे.

तसेच, भगवती रुग्णालयाकरिता सद्य:स्थितीत सुरु असलेल्या व पुढील वर्षी प्रस्तावित असलेल्या कामांच्या आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस (जि.ठाणे) डम्पिंग ग्राउंडसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२२) * २३२ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) असलेल्या डम्पिंग ग्राउंडची क्षमता संपली असून नव्याने आवश्यक असणाऱ्या डम्पिंग ग्राउंडसाठी खारबाव कालवार येथील सर्वे क्र.१३० व १३१ या जागेची मागणी महानगरपालिकेने शासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीची सध्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेस जागा उपलब्ध करून देण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडे सध्या वापरात असलेल्या डंम्पिंग ग्राऊंडची क्षमता संपत असल्याने महसुल विभागाच्या अखत्यारितील स.क्र.१३० व १३१, मौजे खारबाव कालवार येथील १९.३२ हेक्टर जागेवर महानगरपालिकेचा नवीन घनकचरा व्यवस्थापन (संस्करण व विल्हेवाट डम्पिंग ग्राऊंड) प्रकल्प प्रस्तावित आहे.

त्यानुषंगाने, सदर जागेच्या मागणीबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये जिल्हाधिकारी, ठाणे यांना पाठविण्यात आला आहे. तसेच या जागेचा आगाऊ ताबा तातडीने उपलब्ध करून देणेसाठी महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग ते मांडवा (जि.रायगड) दरम्यान असलेल्या अनधिकृत बंगल्यावर कारवाई करण्याबाबत

**(२३) * १५८४ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग ते मांडवा (जि.रायगड) दरम्यान समुद्र किना-यावर असलेल्या अनधिकृत ५८० बंगल्यांना जिल्हाधिका-यांनी प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ नुसार दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास नोटीसा बजावल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये ४४० अनधिकृत बांधकाम धारकांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि.१/१०/२०१९ व दि.३/१०/२०१९ रोजी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(२) प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दि.१४/१०/२०१९ पासून सुनावण्या घेणे सुरू आहे. सुनावणीदरम्यान एकुण ४२ पक्षकारांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील बिनशेती व बांधकाम परवानगी प्राप्त आदेशाच्या प्रती सादर केल्या आहेत. तसेच सर्व प्रकरणांपैकी ३८२ पक्षकारांनी त्यांचेकडील लेखी म्हणणे दाखल केले आहे व त्यापैकी बरीचशी प्रकरणे युक्तीवादाच्या टप्प्यावर आहेत. सदर प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर सूरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नऱ्हे (जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील गायरान जमिनीवर अनधिकृत बांधकामे होत असल्याबाबत

**(२४) * १८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नऱ्हे, किरकटवाडी (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील गायरान जमिनीवरील व पुणे-पानशेत रोड हद्दीमध्ये न्याती स्पा व्हिलास बांधकाम प्रकल्पात टेकड्या फोडून अनधिकृत बांधकामे करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत नऱ्हे हद्दीमध्ये गायरान जमिनीवरील टेकड्यांवर व टेकड्यांच्या उतारावर झालेला अनधिकृत बांधकामांना संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात उंच सखल ठिकाणी चुकीच्या बांधकामांमुळे शेजारील इमारतीच्या खालचा भाग पोखरून कामे सुरु असल्याने बाजूच्या इमारतींना धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास येत असतांनाही तहसीलदार, महानगरपालिका व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कारवाई करत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मौजे नऱ्हे ता.हवेली, येथे महसूली अभिलेखामधील नोंदीवरुन गायरान जमिन दिसून येत नाही. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जानेवारी २०२० मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार टेकड्या फोडून अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर-देवरुख-साखरपा या राज्यमार्गाची झालेली दूरवस्था

**(२५) * १९३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर-देवरुख-साखरपा या राज्यमार्गावर गत ९ महिन्यांपासून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून रस्ता पूर्णत: उखडला असल्याने या मार्गावरुन प्रवास करणा-या प्रवाशांसह वाहन चालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असून वारंवार मोठ्या प्रमाणावर अपघात होवून मनुष्यहानी, वाहनांचे व इतर मालमत्तेचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राज्यमार्गाचे विनाविलंब मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम हाती घेण्यात यावे म्हणून त्या परिसरातील ग्रामस्थांनी गत सहा महिन्यांपासून सातत्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण व उप अभियंता, सा.बां. उपविभाग, देवरुख आदींकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, सदर निर्णयाचे स्वरूप काय आहे व तद्नुसार सदरहू संगमेश्वर-देवरुख-साखरपा राज्यमार्गाचे विनाविलंब मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) होय, निवेदने प्राप्त आहेत.

(३) प्रश्नांकित संगमेश्वर-देवरुख- साखरपा हा रस्ता रा.मा. १६६ असून त्याची एकूण लांबी ३२ कि.मी. आहे.

सदर रा.मा. ३२ कि.मी. लांबीमध्ये मातीकाम, रुंदीकरण व खडीकरण तसेच ३६ मोऱ्या व एका पूलाचे काम झाले असून रस्त्यावरील खड्डे डांबरमिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

तसेच कि.मी.०/०० ते १५/०० मध्ये एका थराचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत प्रगतीत असलेले काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड ते हिंगोली महामार्ग क्रमांक १६१ वरील डोंगरकडा ते वारंगा या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२६) * २८७३ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड ते हिंगोली महामार्ग क्रमांक १६१ वरिल डोंगरकडा ते वारंगा या रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले असून रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही या रस्त्यांचे काम दर्जाहीन करण्यात आल्यामुळे रस्त्यांवर वारंवार खड्डे पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे वाहनधारकांना रस्त्यावरुन वाहन चालवणे अत्यंत गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार निकृष्ट कामास जबाबदार असणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कारवाई व सदर रस्त्याचे काम दर्जेदार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१), (२) व (३) हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

डोंगरकडा ते वारंगा हा रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहे.

(४) नांदेड ते हिंगोली महामार्ग क्रमांक १६१ वरील डोंगरकडा ते वारंगा हा रस्ता लोहा ते वारंगा या रा.म.क्र.३६१ च्या पॅकेज अंतर्गत येतो. सदरील पॅकेज हे कंत्राटदार मे.एम.ई.पी.लॉग जियान, मुंबई यांना दिले गेले असल्याने या रस्त्यावरील खड्डयांच्या दुरुस्तीबाबत कंत्राटदाराला वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु कंत्राटदाराकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सद्यस्थितीत प्राधिकरणाकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व खर्चाने निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा भरण्याचा अंतिम दिनांक १२.०२.२०२० असून निविदा प्रक्रिया पूर्ण होताच खड्डे दुरुस्तीचे कामास तात्काळ सुरुवात करण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील एसआरए अंतर्गत पात्र झोपडपट्टीधारकांना मिळणाऱ्या सदनिकांचे क्षेत्रफळ वाढविण्याबाबत

**(२७) * १८८५ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एसआरए अंतर्गत पात्र झोपडीधारकांना २६९ चौ.फुटाचे घर दिले जात होते परंतु तत्कालीन शासनाने ते वाढवून ३०५ चौ.फूटाचे घर देण्याच्या सूचना केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सदनिकांचे क्षेत्रफळ ५०० चौ.फुट करण्याची मागणी मुंबईचे पालकमंत्री तसेच मा.लोकप्रतिनिधींनी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) योजनेअंतर्गत मिळणा-या सदनिकांचे क्षेत्रफळ वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगर क्षेत्रासाठीच्या अंतिम सुधारित विकास नियंत्रण नियमावली २०१४-२०३४ मध्ये विनियम ३३(१०) नुसार राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये पुनर्वसन सदनिकांचे आकारमान २५ चौ.मी. ऐवजी २७.८८ चौ.मी. करण्याची तरतुद करण्यात आली आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

झोपडीधारकांना द्यावयाच्या अधिक आकारमानाच्या घरांबाबत विश्लेषणात्मक अहवाल तयार करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशी विचारात घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील पुनर्वसन सदनिकांचे चटई क्षेत्र २५ चौ.मी. (२६९ चौ.फुट) वरुन २७.८८ चौ.मी. (३०० चौ.फुट) इतके वाढविण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दर्यापूर (जि.अमरावती) शहरातील चंद्रभागा नदीवरील पुलाचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(२८) * १०५५ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर शहर हे ३ गावे मिळून चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले असून बाभळी-बनोसा-दर्यापूर अशी या शहराची रचना असून बाभळी या भागास जोडणाऱ्या चंद्रभागा नदीवरील पुलाचे बांधकाम अपूर्ण असल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाभळी बनोसा या दोन्ही गावांना जोडणाऱ्या चंद्रभागा नदीवर छोटा पूल अस्तित्वात असून या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात पुराचे पाणी पुलावरून जात असल्याने वाहतूक बंद होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नदीवर ६ कोटी रुपये मंजूर असलेल्या पुलाचे बांधकाम माहे मार्च २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सुरु झाले असून निधीअभावी सदर पुलाचे बांधकाम बंद पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर अपूर्ण पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) • नगरपरिषद वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत दर्यापूर नगरपरिषद क्षेत्रातील चंद्रभागा नदीवरील बाभळी पुलाच्या बांधकामास रु.६ कोटी निधी उपलब्ध करण्यास शासन पत्र दि.६ जुलै, २०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

• सदर ६ कोटी पैकी रु.१ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

• प्रस्तुत कामाचे सुधारित अंदाजपत्रक जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर केले असून पुलाचे काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेतील इलेक्ट्रिक बसेसचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत

**(२९) * ३०४१ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अवजड उद्योग मंत्रालयाच्यावतीने फेम (Faster adoption in manufacturing of Electrical Vehicles) योजनेंतर्गत जीसीसी तत्वावर २०० इलेक्ट्रिक बसेस नवी मुंबई महानगरपालिकेला प्राप्त होणार असून या बसेसचा कारभार ठेकेदाराद्वारे चालविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये मिनी बसेस ३० तर मोठ्या बसेस ७० खरेदी करण्यात येणार असून मिनी बसेस खरेदी करण्यासाठी ४५ लाख तर मोठया बसेससाठी ५५ लाखांचे अनुदान मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुदान थेट ठेकेदाराच्या बँक खात्यात जमा होणार असून या बसेस ठेकेदार खरेदी करणार असल्याची माहिती दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे इलेक्ट्रिक बसेसचा प्रस्ताव रद्द करावा अशी मागणी मा.मुख्यमंत्री तसेच नगरविकास मंत्री यांच्याकडे करण्यात आली असून उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) • केंद्र शासनाच्या फेम (Faster Adoption in Manufacturing of Electrical Vehicles) योजने अंतर्गत जीसीसी तत्वावर नवी मुंबई परिवहन उपक्रमासाठी १०० इलेक्ट्रिक बसेस प्राप्त होणार आहेत.

• जीसीसी तत्वातील नमूद धोरणानुसार ठेकेदाराची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहे.

१) १२ वर्षासाठी प्रति कि.मी. दरानुसार बस उपलब्ध करून देणे.

२) अनुदानाव्यतिरिक्त बस खरेदीची रक्कम, विमा व इतर शासकीय कर भरणे.

३) बस चालक उपलब्धता, बस चार्जिंग खर्च, बस देखभाल दुरूस्ती करणे.

• या बसमध्ये वाहक परिवहन उपक्रमाचा असून, दैनंदिन जमा होणारी तिकिट विक्रीची रक्कम उपक्रमाच्या खाती जमा होणार आहे. बस संचलनाचे मार्ग व तिकिट दर यावर संपूर्ण नियंत्रण परिवहन उपक्रमाचे असणार आहे.

(२), (३) व (४) • केंद्र शासनाकडून मिनी बसेसकरीता रू. ४५ लाख तर मोठ्या बसेसकरीता रू. ५५ लाख इतका निधी प्राप्त होणार आहे.

• केंद्र शासनाच्या दि. ०४.०६.२०१९ च्या पत्रानुसार मान्यता प्राप्त परीयोजनेचा सर्व निधी केंद्र शासनामार्फत संबंधित निमशासकीय/शासकीय उपक्रमास अदा करण्यात येणार आहे.

• इलेक्ट्रिक बसेसचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सदस्य यांचे निवेदन प्राप्त झाले असून, त्यावर महानगरपालिकेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीच्या समस्यांबाबत

**(३०) * ५९७६ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील बाह्यवळणाची कामे मार्गी न लागल्यामुळे महामार्ग मृत्यूचा सापळा झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावर दिवसाआड अपघात होऊन त्यात अनेकांचा बळी गेला व अनेक जणांना कायमचे अपंगत्व आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चांडोली ते आळेफाटा या सुमारे पन्नास कि.मी. अंतरात अपघाताच्या अनेक घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर बाबीकडे महामार्ग प्राधिकरणाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करून रस्ता दुरुस्तीची कामे पुर्ण करून अपघात रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग हा केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो.
सदर महामार्गावरील नारायणगाव बाहयवळणाचे तसेच खेड घाटाच्या री-अलायनमेंटचे काम प्रगतीपथावर आहे.

तथापि पुणे जिल्हयातील इतर ४ बाहयवळणाची कामे स्थानिक ग्रामस्थाच्या भूसंपादनासाठी असलेल्या विरोधामुळे मार्गी लागली नव्हती. परंतु सद्यस्थितीत सदर चार बाहयवळणांपैकी खेड व मंचर बायपासची निविदा दि. १६.०१.२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच कळंब व आळेफाटा यांची निविदा दि.२९.०१.२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली असून सदर कामांची निविदा प्रक्रिया प्राधिकरणामार्फत सुरु आहे. निविदा नियुक्ती होताच सदर काम हाती घेण्यात येणार आहे.

(२) सदर अपघात होण्यामागे प्रस्तुत मार्गाची तांत्रिक कमतरता कारणीभूत नसल्याचे नियुक्त स्वतंत्र अभियंता यांनी निदर्शनास आणून दिले आहे. तसेच वाहनातील यांत्रिक बिघाड, वाहने जास्त वेगाने जाणे,मद्यधुंद होवून वाहन चालविणे, वाहन नियंत्रणात नसणे अशा विविध कारणांमुळे अपघात होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) अश्या घटना घडत असल्या तरी महामार्गाच्या तांत्रिक कमतरतेमुळे त्या घटना घडल्याचे निदर्शनास येत नाही.

(४) व (५) हे खरे नाही.

प्राधिकरणाकडून महामार्गाच्या सुरक्षिततेसाठी मे.आय.आय.टी. मुंबई सुरक्षा सल्लागार नियुक्त करण्यात आला असून त्यांचेमार्फत महामार्गाचे वेळोवेळी सेफ्टी ऑडीट केले जाते व त्यानुसार सुरक्षिततेबाबत स्वतंत्र अभियंता यांचेमार्फत आवश्यक खबरदारी घेऊन काम करण्यात येत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(६) पुणे जिल्हयातील ४ बाहयवळणांच्या भूसंपादनास स्थानिक ग्रामस्थांचा झालेला विरोध.

-----------------

## बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील देवगाव-कुसळी-माळेगाव रस्त्याचे काम न करताही कंत्राटदाराचे बिल काढल्याबाबत

**(३१) * ५३५६ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील देवगाव-कुसळी-माळेगाव रस्त्याचे काम न करता कंत्राटदाराचे बिल काढल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचे १ कोटी रुपयांचे देयक अदा करण्यात आले असून पुल व रस्ता दोन्ही कामामध्ये डांबराचा गेटपास दुसऱ्या कामावर वापरण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची अद्यापही चौकशी झाली नसून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्य अभियंता, सा.बां. परिमंडळ, औरंगाबाद यांना निवेदन देऊन चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरहू प्रकरणी दोषी असणाऱ्यांविरुद्ध शासनस्तरावरुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय. हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) प्रश्नाधीन कामावर रू.९७.८९ लक्ष इतका निधी खर्च झाला असून डांबराचा गेटपास दुसऱ्या कामावर वापरण्यात आल्याचे आढळून आले नाही.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्या मार्फत प्राथमिक तपासणी करण्यात आली असून त्यानुसार प्रश्नाधीन कामात अनियमितता आढळून आल्याने श्री.पी.एस. मोरे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बार्शी नगरपरिषद (जि.सोलापूर) हद्दीमध्ये नगरोत्थान योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील रस्ते विकासासाठीची कामे विना निविदा दिल्याबाबत

**(३२) * १०२० श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी नगरपरिषद (जि.सोलापूर) हद्दीमध्ये नगरोत्थान योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील रस्ते विकासासाठी ४० कोटी रुपयांची कामे विना निविदा युनिटी मल्टीकॉन्स या कंपनीला देण्याबाबतचा ठराव मंजूर केल्याने या ठरावा विरोधात महानगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी स्थगिती आदेश दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत रुपये ४० कोटींचा रस्ते विकास प्रकल्प मार्च २०११ मध्ये बार्शी नगरपरिषदेस मंजूर करण्यात आला होता.

• त्यानंतर बार्शी नगरपरिषदेने रुपये ४९.५४ कोटींचे दुसऱ्या टप्प्यातील रस्त्यांचे काम विनानिविदा युनिटी मल्टीकॉन्स यांना देण्याचा ठराव दिनांक १८.०३.२०१७ रोजी केला होता.

• परंतु सदरच्या ठरावास महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून दिनांक ०५.०४.२०१८ च्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

(२) व (३) • जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी बार्शी नगरपरिषदेच्या दिनांक १८.०३.२०१७ रोजीच्या ठरावास स्थगिती दिलेली असल्यामुळे त्या ठरावानुसार पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

-----------------

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस महामार्ग ते मुंबई गोवा महामार्गाला जोडणारा खोपोली ते वाकण (जि.रायगड) या रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामाबाबत

**(३३) * २०४८ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे एक्स्प्रेस महामार्ग ते मुंबई गोवा महामार्गाला जोडणारा ४० ते ४५ कि.मी अंतराच्या खोपोली ते वाकण या रायगड जिल्ह्यातील महत्वाची व अत्यंत दुरवस्था झालेला हा राज्य मार्ग एम.एस.आर.डी.सी.कडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर मार्गाच्या दुरवस्थेत अजूनच भर पडल्याने व एम.एस.आर.डी.सी. कडून अत्यंत संथ गतीने काम सुरु असल्याने येथून ये जा करणाऱ्या वाहतूकदारांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.एस.आर.डी.सी.कडून करण्यात येणाऱ्या सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून सदरच्या मार्गावरील दोन मोठ्या पुलांसह रस्ता दुरूस्तीचे काम लवकरात लवकर करून वाहतूक सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

केद्रींय रस्ते वाहतुक व महामार्ग विभाग (MoRTH), मंत्रालयाने, वाकण-पाली-खोपोली हा रस्ता नवीन राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ चा भाग म्हणून घोषित केला आहे. सदर रस्ता दि.२३ जुन २०१७ रोजी सा.बां. विभागकडून म.रा.र.वि. महामंडळास हस्तांतरीत झाला असुन, सदर रस्तांचे दुहेरीकरणाचे (२ lane with paved shoulder) बांधकाम EPC तत्वावर केद्रींय मंत्रालयाच्या निर्देशानुसार, म.रा.र.वि.महामंडळ (MSRDC), मुंबई मार्फत हाती घेण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

गत वर्षी नेहमीच्या पावसापेक्षा जास्त काळ पावसाळा व अतिपर्जन्य वृष्टीमुळे अस्तित्वातील रस्त्याची लांबी क्षतीगस्त झाली होती. परंतु, पावसाळा कमी होताच, रस्त्याची डागडुजी करुन घेऊन, वाहतुकीस सुरळीत करण्यात आला आहे.

(३) काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. परंतु, प्रत्येक तक्रारीचे तांत्रिक दृष्टीने तपासणी करुन स्थानिक नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले आहे.

(४) विषयांकित मार्गावरील जांभूळपाडा, बागुलपाडा व पाली गावानजीकच्या पुलांच्या पुनर्बांधणीची निवीदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मे.विशाल कंन्सट्रक्शन, मुलुंड ठाणे यांना निविदा स्विकृती पत्र दि. १०.१२.२०१९ रोजी दिले असून, प्रत्यक्षात बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा दिघोरी सेनापती नगर (नागपूर) येथील दिघोरी घाटा लगतच्या नाल्यावरील पूल जीर्ण झाल्याबाबत

**(३४) * ५८८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दक्षिण नागपूर विभागातील मौजा दिघोरी सेनापती नगर येथील दिघोरी घाटा लगतच्या नाल्यावरील पूल जीर्ण झाल्याने धोकादायक अवस्थेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जीर्ण पूल पाडून त्या ठिकाणी नवीन पूल उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून शासनाकडे सातत्याने होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्‌नुषंगाने सदरहू जीर्ण व धोकादायक पूल पाडून नवीन पूल उभारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) मौजा दिघोरी सेनापती नगर येथील दिघोरी घाटा लगतच्या नाल्यावर नागपूर सुधार प्रन्यासकडून अंदाजे १६ वर्षापूर्वी ६०० मी.मी.व्यासाचे चार आर.सी.सी. पाईप चा वापर करुन व त्यावर स्लॅब चे बांधकाम करुन, सदरचा रस्ता वाहतुकीस सुरु केलेला आहे. सद्य:स्थितीत वाहतुक सुरु आहे.

पावसाळ्यात या नाल्याला प्रमाणापेक्षा जास्त पाणी आल्यास या बांधकामावरुन, पाणी वाहत असल्याने, त्यावेळी येथील वाहतूक विस्कळीत होते.

त्यामुळे या ठिकाणी १२ ही महिने वाहतूक सुरळीत व सुरक्षित सुरु रहावी यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांद्वारा केलेल्या मागणीस अनुसरुन, या नाल्यावर जास्त उंचीचा नवीन पूल उभारण्याच्या अनुषंगाने, नागपूर महानगरपालिकेकडून रु.८२.०८ लक्षचा आराखडा तयार केलेला असून, निधी उपलब्धता आणि प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने, सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून शासनाकडे सादर झालेला आहे.

-----------------

## अहमदनगर शहरालगतच्या सोलापूर-पुणे-मनमाड बाह्यवळण रस्त्याबाबत

**(३५) * ३६७३ श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहराजवळील सोलापूर-पुणे-मनमाड या बाह्यवळण रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे व जे काम सुरु आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) कामाचा दर्जा विनिर्देशाप्रमाणे असून कामाची प्रगती निविदा अटी व शर्तीनुसार ठेवण्यात आली नाही, हे खरे आहे.
(२) निविदा अटी/शर्तीनुसार संबंधित कंत्राटदारावर विलंबाकरीता दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील तीन वाड्यांना जोडणाऱ्या पुलासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३६) * २०१५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील फणसवाडी, पायरवाडी आणि गायकरवाडी या तीन वाड्यांची वस्ती नदीपलीकडे असून पावसाळ्यामध्ये नदीचे पाणी वाढल्यानंतर अत्यंत जीर्ण अवस्थेतील धोकादायक बनलेल्या लोखंडी साकवाचा आधार घेवून पलीकडे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत वारंवार पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केल्यानंतर सदर ठिकाणी पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या योजनेतून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेने कळविल्याचे मा.राज्यमंत्री, ग्रामविकास यांनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधीची पुर्तता करुन सदर पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सन २०१६-१७ च्या साकव दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रु.४.०० लक्ष किंमतीस साकव दुरुस्तीचे काम करण्यात आले असून सद्य:स्थितीत साकव सुस्थितीत आहे.

(२) अशा प्रकारचा कोणताही पत्रव्यवहार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आढळून येत नाही.
(३) व (४) विषयांकित पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) न्यायालयाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(३७) * ४७६५ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) न्यायालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली असून इमारत मोडकळीस आली आहे तसेच इमारतीच्या भिंतींना तडे गेल्यामुळे प्लास्टर पडत असून पावसाळ्यात इमारतीच्या छतातुन गळती होत असल्याने न्यायालयातील वकिल, कर्मचारी व नागरिकांची अत्यंत गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण न्यायालयाचे बांधकाम करण्यासाठी मंजूरी देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.
कल्याण न्यायालयीन परिसराच्या आवारात एकूण ३ इमारती आहेत. त्यापैकी एक इमारत सन १९०८-०९ साली बांधण्यात आलेली असून सदर इमारत बैठी कौलारु आहे. सदर इमारतीमध्ये पावसाळी पाण्याची गळती होत आहे.

दुसरी इमारत सन १९७३ साली बांधण्यात आलेली असून सदर इमारतीला तडे गेलेले आहेत व पावसाळ्यात पाणी गळती होत आहे.

तिसरी इमारत सन २००३ साली तळ+२ मजल्यांची बांधण्यात आलेली असून सदर इमारतीमध्ये पावसाळ्यात काही प्रमाणात गळती होत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दुसऱ्या न्यायालयीन इमारतीच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीसाठी रु.९.६० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच तिसऱ्या इमारतीवर शेड बांधण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

तसेच सदरील सर्व इमारतींमध्ये पावसाळयात होणारी पाण्याची गळती थांबविणेकरीता उपाययोजना करण्याकरीता मा.जिल्हा न्यायाधीश, ठाणे यांनी दिनांक ९/१/२०२० रोजी घेतलेल्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागास सूचना देण्यात आल्या आहेत. इमारतींच्या दुरुस्तीकरीता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सदर ठिकाणी जुन्या इमारती पाडून नवीन बहुमजली इमारत बांधण्याकरिता, इमारतीचे आराखडे व नकाशे तयार करण्याची कार्यवाही मा.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांचे मार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा ते वाकोडी फाटा तसेच मलकापूर ते नांदुरा (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) या महामार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) * २२३९ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ते मलकापूर शहरातून वाकोडी (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) फाट्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून

रस्त्याची दूरवस्था झाली असून वाहतुकीस अयोग्य असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्ता त्वरित दुरुस्तीसह मजबुतीकरण व नूतनीकरण करणेबाबत स्थानिक नगराध्यक्ष ॲड श्री.हरीश रावळ यांनी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मलकापूर ते नांदुरा या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा ची खड्डयांमुळे दूरवस्था झाल्याने अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची बाब दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ते वाकोडी फाटा (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) पर्यंत रस्ता तसेच मलकापूर ते नांदुरा, या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ चे दुरुस्तीसह मजबुतीकरण व नूतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर रस्त्याच्या लांबीमध्ये सन २०१९ मधील सततच्या व लांबलेल्या पावसामुळे काही प्रमाणात डांबरी पृष्ठभागावर खड्डे पडलेले होते.

(२) होय.

(३) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या अमरावती (कि.मी.१६६.००) ते चिखली (कि.मी.३६०.००) या मार्गाची सप्टेंबर २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे हा मार्ग क्षतिग्रस्त झाला होता.

(४) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ते मलकापूर शहरातून वाकोडी (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) फाट्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे वेळेत भरण्यात आलेले असून डांबरी नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

तसेच मलकापूर ते नांदूरा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.६ चा भाग असून केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. अमरावती ते चिखली (कि.मी.१६६.०० ते कि.मी.३६०.००) या सेक्शनच्या चौपदरीकरणाच्या कामाची निविदा खंडीत करण्यात आल्यांनतर उर्वरित कामांचे चार भाग करून नव्याने निविदा प्राप्त झाल्या आहेत, कंत्राटदाराच्या निश्चितीनंतर चौपदरीकरणाच्या कामास सुरूवात होईल.

सदर प्रकल्पाच्या निविदा बोलाविण्यात आल्या असल्याने या महामार्गाचे मजबुतीकरण व नुतनीकरण करणे अपेक्षित नव्हते. तथापी, खड्डयांची दुरूस्ती व तातडीच्या दुरूस्त्या भा.रा.रा.प्राधिकरणामार्फत करून रस्ता वाहतुकीस योग्य स्थितीत ठेवण्यात आला आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.वाशिम) शहरातील प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेला मंजूरी मिळण्याबाबत

**(३९) * ३८२० श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशिम) शहरातील पाण्याची समस्या लक्षात घेता चाकातिर्थ प्रकल्पाअंतर्गत कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना गत ५ वर्षापूर्वी प्रस्तावित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेला अद्याप मंजूरी मिळाली नसल्याने मालेगांव शहरातील नागरीकांची पाण्याअभावी प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर योजनेला तातडीने मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मालेगांव नगरपंचायत (जि.वाशिम) दिनांक १७.०७.२०१५ च्या अधिसूचनेनुसार स्थापन झाली आहे. नगरपंचायत स्थापन झाल्यानंतर वाढीव पाणीपुरवठा योजना तयार करून त्यास तांत्रिक मान्यता घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) मालेगांव नगरपंचायत स्थापन झाल्यानंतर नगरपंचायत हद्दीमधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी रु.१३६.५१ लक्ष एवढ्या किंमतीची तातडीची पाणी पुरवठा योजना पूर्ण करुन त्याव्दारे सद्यस्थितीत शहरास पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) व (४) • मालेगांव नगरपंचायतीने तयार केलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

• तसेच, चाकातिर्थ प्रकल्पावरून वाढीव पाणी आरक्षण मिळविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

• वाढीव पाणी आरक्षण मिळवून व तांत्रिक मान्यतेसह प्रस्ताव शासनाकडे सादर झाल्यानंतर या शहरास वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## पंढरपूर (वाखरी) (जि.सोलापुर) ते म्हसवड या रस्त्यांच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन केलेला गैरव्यवहार

**(४०) * ७६४ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (वाखरी) ते म्हसवड या राष्ट्रीय महामार्गाच्या कामामध्ये पुणे येथील रोडवेज सोल्युशन या प्रा.लि. कंपनीने संबंधित अधिकारी यांच्याशी संगनमत करून माहे फेब्रुवारी, २०१९ ते दिनांक २० डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान बेकायदेशीररित्या उपसा केलेली निकृष्ट दर्जाची माती मिश्रित वाळू वापरुन त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामात इतरही साहित्य निकृष्ट दर्जाचे वापरले असून सदर कामावर रस्ते विकास महामंडळाचे अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांनी जाणीवपूर्वक ठेकेदार यांना हाताशी धरुन निकृष्ट दर्जाचे काम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तातडीने कारवाई करावी म्हणून तेथील नागरिकांनी व विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी यांनी याबाबतीत अधिक्षक अभियंता रस्ते विकास महामंडळ, पुणे यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित दोषी अधिकारी व संबंधित ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

श्री. किरण साठे, हे नागरिक असून यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे येथे प्राप्त झाले आहे.

(४) रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय (MoRTH) च्या स्पेशिफिकेशन Cl.No.६०२.२.६.३ अन्वये प्रकल्पामध्ये फक्त कृत्रीम वाळूचा (Crush Sand) वापर केला जात असल्याने खराब प्रतीच्या नैसर्गिक वाळू वापरली जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

निविदा शर्तीप्रमाणे काम होत असल्यामुळे अधिकारी/ठेकेदार यांचेवर कार्यवाही करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ताडदेव (मुंबई) येथील एम.पी.मिल कंपाऊंड मधील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या प्रकल्पातील गैरव्यवहाराबाबत

**(४१) * १६७६ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडदेव (मुंबई) येथील एम.पी.मिल कंपाऊंड मधील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या प्रकल्पातील गैरव्यवहारासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री यांनी लोकायुक्तांद्वारे चौकशी आदेशित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारासंदर्भात चौकशी अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

ताडदेव येथील एम.पी.मिल कंपाउंड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील गैरव्यवहारासंदर्भात, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ चे कलम १७(३) मधील तरतुदीनुसार मा.लोकआयुक्तांना अन्वेषण करण्याचे आदेश दिले होते.

(२) व (३) या संदर्भात मा.लोक आयुक्त कार्यालयाने दि.१७.०२.२०२० च्या पत्रान्वये कळविलेल्या माहितीनुसार उक्त गैरव्यवहारासंदर्भातील अन्वेषण मा.लोक आयुक्त यांनी महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आुयक्त अधिनियम, १९७१ मधील तरतुदीनुसार पूर्ण केलेले आहे. महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ चे कलम २(क) (एक) मधील तरतुदीनुसार सदर प्रकरणातील प्रतिवादी (लोकसेवक) म्हणजेच तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचेबाबतीत मा.मुख्यमंत्री हेच “सक्षम प्राधिकारी” असल्यामुळे मा.लोक आयुक्तांनी सदर प्रकरणातील अधिनियमाच्या कलम १२(३) नुसारचा शिफारस अहवाल तत्कालीन

मा.मुख्यमंत्र्यांना दि.२७.१२.२०१८ च्या पत्राद्वारे सादर केलेला आहे. सदर शिफारस अहवालानंतर प्रतिवादी (लोकसेवक) तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांना मंत्रीमंडळ फेरबदल करताना वगळण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई शहरातील विविध गावठाणामध्ये भूमिपूत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याच्या निर्णयाबाबत

**(४२) * ३ श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई शहरातील विविध गावठाणांमध्ये भूमिपूत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याकरिता शासनाने समूह विकास योजना जाहीर केली परंतु त्या योजनेमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या हितांच्या अनेक बाबींचा अंतर्भाव नसल्याने सदरच्या योजनेस ग्रामस्थांचा विरोध असून नवी मुंबई क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या संघटनांनी याबाबत हरकती व सूचना दिलेल्या असून शासनास लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व विविध संघटनांनी अनेकवेळा निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने माहे डिसेंबर, २०१५ पर्यंतची सर्वच बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतल्याने नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी केलेली सर्वच बांधकामे नियमित होण्याकरिता ग्रामस्थांशी चर्चा करून मूळ गावठाणाबरोबरच विस्तारित गावठाणातील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी धारण केलेल्या महसुली जमिनीचे सर्वेक्षण करून त्यांना मालकी हक्क देण्यात यावा तसेच प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या हिताचा निर्णय घेऊन प्रकल्पग्रस्तांना दिलासा द्यावा म्हणून माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) असल्यास, नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या हितांच्या बाबींचा अंतर्भाव नसलेली योजना ग्रामस्थांवर लादण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास कायम विरोधच राहील अशी भावना सर्व ग्रामस्थांमध्ये असून याबाबतची दखल शासनाने घेतली आहे काय, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नवी मुंबईतील मूळ गावठाणे व गावठाणालगत प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांचे नियमितीकरण व पुनर्विकासाबाबत, समूह विकास योजनेची (क्लस्टर योजना) तरतूद नवी मुंबईतील सिडको नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्राच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम ३५ अन्वये नव्याने अंतर्भूत करण्यासाठी तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत यासंदर्भाने विनियम ४६(६) च्या नव्याने अंतर्भाव करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१एए) अन्वये फेरबदलाची अधिसूचना दि.०४.०३.२०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर फेरबदलाच्या सुचनेच्या अनुषंगाने जनतेने, लोकप्रतिनिधींनी हरकती / सूचना सादर केल्या असून लोकप्रतिनिधींची वेळोवेळी निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर अधिसूचनेच्या फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून अंतिम निर्णय शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) व (५) नवी मुबंईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाचे सर्वेक्षण करण्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या मागणीनुसार त्यांनी धारण केलेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांच्या मदतीने करणेबाबत शासनाकडून सिडको महामंडळास दि. १६/०३/२०१७ च्या पत्रानुसार निर्देश देण्यात आलेले आहेत. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाचे जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांच्यामार्फत सर्वेक्षणाची

कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर बांधकामे नियमित होण्याच्या अनुषंगाने शासनाकडून आवश्यक निर्णय घेण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील महानगरपालिका व नगरपालिका तसेच शासकीय प्राधिकरण यांच्या अंतर्गत येणाऱ्या बांधकामांना एकसमान बांधकाम नियमावली करण्याबाबत

**(४३) * ६२८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील विविध महानगरपालिका व नगरपालिका तसेच विविध शासकीय प्राधिकरण यांच्या अंतर्गत होणाऱ्या बांधकामांना मिळणाऱ्या परवानगींचे नियम वेगवेगळे असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे झोपडपट्टीमुक्त शहर करण्याच्या कार्यवाहीमध्ये उशीर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनस्तरावर समान बांधकाम नियमावली करण्याकरिता कार्यवाही केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, किती कालावधीमध्ये सदर नियमावली करण्यात येणार आहे तसेच नियमावलीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. हे खरे आहे.

महाराष्ट्रातील नगरपरिषदा/नगरपंचायती/महानगरपालिका तसेच नियोजन प्राधिकरणे यांच्या अंतर्गत बांधकामांना मिळणाऱ्या परवानगीचे नियम (विकास नियंत्रण नियमावली) वेगवेगळे असल्याने केंद्र शासनाचे औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाच्या (DIPP) धोरणानुसार तसेच लोक हिताचे दृष्टीने विचार करुन तसेच व्यवसाय सुलभतेच्या रुपरेषेनुसार समावेशक एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावली संपूर्ण राज्यासाठी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्यानुसार शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१क क) मधील तरतूदीप्रमाणे शासनास प्राप्त अधिकारात सूचना दिनांक दि.०८/०३/२०१९ रोजीच्या निर्णयान्वये राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच इतर नियोजन प्राधिकरणांकरिता सर्व समावेशक एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावली नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी सूचना प्रसिध्द केली आहे.

(४) उक्त दि.०८/०३/२०१९ रोजीच्या सूचनेच्या अनुषंगाने आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण झाली असून सदर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस अधिनियमाच्या कलम ३७ (१ कक) (ग) अन्वये अंतिम मंजूरी देऊन ती लागू करण्याबाबतचा अंतिम निर्णय शासनस्तरावर घेण्यात येत असून त्यानंतर सदर नियमावलीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

(५) विलंब झालेला नसल्याने, प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्याच्या वर्धा नदीवरील बेलोरा पुलाच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारे साहित्य चोरी झाल्याबाबत

**(४४) * ११३४ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्याच्या वर्धा नदीच्या बेलोरा या तेलंगाणाकडे जाणाऱ्या पुलाच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारे साहित्य चोरीला गेल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन राज्यांना जोडणाऱ्या रस्त्यावर मोठ्या नदीवरील पुलावरुन दिवस-रात्र अवजड वाहतूक सतत सुरु असल्याने पूलाच्या झालेल्या दुरव्यवस्थेबाबत वारंवार तक्रारी केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाच्या लोखंडी प्लेट्स व बेरिंग नादुरुस्त झाले आहेत तसेच पुलावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे दुरुस्तीसाठी कंत्राटदाराकडून कामे सुरु असतांना महत्वपूर्ण साहित्याची चोरी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार शासनाने तक्रार नोंदवून गुन्हेगारांना शासन करण्याबाबत व सदर पुलावरुन वाहतूक सुरळीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अशा प्रकारची कुठलीही तक्रार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेली नाही. परंतु स्थानिक वर्तमानपत्र दै.लोकमत मध्ये दि.०८.०१.२०२० रोजीच्या वर्तमानपत्रात वर्धा नदी पुलावरून ७ लोखंडी प्लेट चोरीला गेल्याची बातमी प्रकाशित झाली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) फक्त ७ लोखंडी प्लेटची चोरी झालेली असल्याचे स्थानिक वर्तमानपत्रानुसार दिसून येते परंतु कंत्राटदाराकडून अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) चोरीबाबत विभागाकडे कंत्राटदाराने कुठलीही तक्रार केलेली नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. सदर पुलावरून वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) परिसरातील सेझ बाधितांचे १३० कोटी रुपये सिडकोने वाटप न केल्याबाबत

**(४५) * ३३८७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) परिसरात सिडकोच्या भागीदारीतून नवी मुंबई सेझची निर्मिती करण्यात आली असून यामध्ये नवी मुंबई सेझची ७४ टक्के आणि सिडकोची २६ टक्के भागीदारी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेझ निर्मितीसाठी जेएनपीटी आणि सिडकोने द्रोणागिरी नोड परिसरातील हजारो हेक्टर जमीन लीजवर दिल्यामुळे उरण तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी, मच्छिमारांना पारंपारिक व्यवसायाला मुकावे लागल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याने बाधित प्रकल्पग्रस्तांना नुकसानभरपाई व पुनर्वसनासाठी नवी मुंबई सेझने १३० कोटी रुपये सिडकोकडे सुपूर्द केल्याचे तत्कालीन मुख्य सचिव तसेच पर्यावरण आणि एडीएफ मुख्य सचिव यांना दिनांक ७ मार्च, २०१४ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या पत्रात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसन व नुकसान भरपाईसाठी देण्यात आलेल्या १३० कोटी रुपयांचे अद्याप वाटपच झाले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उरण परिसरात सिडकोच्या भागीदारीतून नवी मुंबई सेझची निर्मितीसाठी जे.एन.पी.टी. आणि सिडकोने द्रोणागिरी परिसरातील जमीन भाडेतत्वावर दिली आहे. विकास करारनाम्यातील तरतुदीनुसार

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सुमारे १३० कोटी रुपये समभागाच्या स्वरुपात सन २००७ व २००८ मध्ये सिडकोकडे प्राप्त झाले असून ते १२.५% योजनेंतर्गत विकासकामासाठी वापरण्यात येणार आहेत. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना १२.५% योजनेंतर्गत भूखंडांचे वाटप सिडकोमार्फत करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेगाव ते पंढरपूर या पालखी महामार्गाच्या कामाची मुदत संपूनही अद्यापही या महामार्गाचे काम पूर्ण झाले नसल्याबाबत

**(४६) * ४७०२ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगाव (जि.बुलढाणा) ते पंढरपूर (जि.सोलापुर) या पालखी महामार्गाच्या कामाची मुदत दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास संपूनही अद्यापपर्यंत या महामार्गाचे काम पूर्ण झालेले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कंत्राटदाराने नियमानुसार काम मुदतीत पूर्ण न केल्यास प्रतिदिनी ८ लाख रुपये दंड आकारणे आवश्यक असतांनाही तशी कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्रींय रस्ते वाहतुक व महामार्ग विभागातील मरारविमहामंडळ (मर्या) अंतर्गत विषयांकित रस्त्यापैकी औरंगाबाद विभागास मंठा सरहद्द ते कुसळंब नविन राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी या रस्त्याचे व मजबुतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. मंठा सरहद्द ते कुसळंब या महामार्गाचे बांधकाम करीत असतांना तेथील नागरीकांनी बरेचदा काम बंद केले होते. त्यामुळे दिनांक

०७/०५/२०१८ पासून काही महीने कामावर पोलीस बंदोबस्त घेवुन काम चालू करण्यात आले. त्यामुळे कामास विलंब झाला. सदर महामार्गाचे बांधकम शिघ्र गतीने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

तसेच, बुलढाणा जिल्हयातील ३ कामे मंजुर असुन त्यापैकी एक काम संथ गतीने सुरु आहे.

(२) होय हे खरे आहे, कारण औरंगाबाद विभागातील सदरचे महामार्गाचे बांधकाम करीत असतांना नागरीकांचा तिव्र विरोध यामुळे ठेकेदारास मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे.

सदरचे महामार्गाचे बांधकाम माहे जुलै २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बुलढाणा जिल्हयातील संथ गतीने असलेल्या कामास कंत्राटदाराला रु. ८.०० लक्ष प्रती दिन प्रमाणे क्षतीपूर्तीची सूचना देण्यात आलेली आहे.

(३) सदर महामार्गाचे बांधकाम प्रगतीपथावर असुन सरासरी ८० टक्के काम पूर्ण झाले असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

सदरचे महामार्गाचे पुर्ण झालेली लांबी नागरीकांना तात्काळ वाहतुकीसाठी सुरक्षेची खात्री करुन उपलब्ध करण्यात आलेली आहे.

(४) १. स्थानिक नागरिक, विविध संघटना, इत्यादींचा तीव्र विरोध

२. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडे तोडण्याची परवानगी

३. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या विदयुत वाहिन्या, पाणी पुरवठा वाहिन्या इ. चे स्थलांतर.

४. सदरील काही लांबीतील काम पोलीस संरक्षणात करावे लागले.

५. सदर महामार्गाचे बांधकामासाठी उदा. वळण सुधारणा, पथकर नाका, नवीन आखणी इ.साठी लागणारे जमीनीचे भुसंपादनासाठी केंद्र शासनाने वेळोवेळी भूसंपादनाबाबतचे धोरण बदलल्याने त्यासाठी विलंब झाला.

६. बुलढाणा जिल्हयातील या रस्त्याचे ३ पॅकेज असुन त्यापैकी

अ) पॅकेज क्र. १ खामगाव ते देऊळगाव साकर्शा या भागातील काम ८५ टक्के पूर्ण झाले असून सदर कामाचा मुदतवाढीचा प्रस्ताव सडक परिवहन व राज्य मार्ग मंत्रालय यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

ब) पॅकेज क्र. २ देऊळगाव साकर्शा ते मेहकर या भागातील काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे.

क) पॅकेज क्र. ३ मेहकर, लोणार ते अतिसपूर या लांबीमधील जवळपास ५६% काम पूर्ण झाले आहे. प्रती दिन ८ लक्ष रुपये प्रमाणे क्षतीपुर्तीच्या कार्यवाहीची सूचना दिनांक १४.११.२०१९ रोजी कंत्राटदारास लेखी देण्यात आलेली आहे.

-----------------

## चांदिवली (मुंबई) येथे अद्ययावत रुग्णालय बांधण्याबाबत

**(४७) * ८७४ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदिवली (मुंबई) येथे अडीचशे खाटांचे अद्ययावत रुग्णालय बांधण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार चांदिवलीमध्ये सुमारे एक लाख चौ.फुटांच्या जागेत रुग्णालयाची सात मजल्यांची इमारत उभारली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मौजे चांदिवली येथील रुग्णालयाचे आरक्षण असलेला न.भू.क्र. ११अ/४ हा १०,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २३.०७.२०१९ रोजी ताब्यात घेतला आहे.

त्यानुसार सदर भूखंडावर अद्ययावत रुग्णालय बांधण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) सदर रुग्णालय बांधण्यास मंजुरीसापेक्ष योग्य त्या निधीची तरतुद करण्यात येणार आहे.

तद्नंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या हद्दीतील मनोरमा इमारत पडून दोन व्यक्तींचा झालेला मृत्यू

**(४८) * २३३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) हद्दीत माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मनोरमा इमारत पडून दोन व्यक्तींचा मृत्यू झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मनोरमा इमारत ही बेकायदा व धोकादायक असल्याबाबत अनेक तक्रारी करून देखील प्रभाग अधिकारी यांच्यासह महानगरपालिका कर्मचारी यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सदर दुर्घटनेस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ३ मधील कमला हॉटेलची ३ मजली इमारत अतिधोकादायक घोषित करून ४ वर्षे उलटून गेली तरी अद्याप प्रभाग अधिकारी कारवाई करत नसल्याने संबंधित प्रभाग अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मौजे नागाव येथील "मनोरमा" ही अनधिकृत इमारत दिनांक २४.०८.२०१९ रोजी दुर्घनाग्रस्त झाली. सदर दुर्घटनेत दोन व्यक्तीचा मृत्यू झाला होता.

सदर दुर्घटनाग्रस्त इमारतीबाबत तक्रार प्राप्त झाली असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर दुर्घटनेस जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करुन चौकशी अहवाल चार आठवड्यात सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना सुचित केले आहे.

(३), (४) व (५) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कमला हॉटेल असलेल्या अतिधोकादायक इमारतीस प्रथमत: दिनांक ०८.०६.२०१७ रोजी अतिधोकादायक असल्याबाबत संबंधिताविरुध्द नोटीस बजाविली आहे. सदर नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ व २६८ अन्वये दिली आहे. सदर इमारत निष्कासित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

सदर प्रकरणी झालेल्या दिरंगाईबाबत चौकशी करुन चार आठवड्यात अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना सुचित केले आहे.

-----------------

## पुणे येथील पोतदार स्कूल ते नवले पूल पर्यंत आंबेगाव हद्दीतील वडगाव ते कात्रज चौक सर्व्हिस रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) * २१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पोतदार स्कूल ते नवले पूल पर्यंत आंबेगाव हद्दीतील वडगाव ते कात्रज चौक सर्व्हिस रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यासाठी कार्यादेश क्र.१५३ सन २०१८ नुसार १ कोटी रुपयांची निविदा काढली होती व त्यानुसार कार्यादेश क्र. ३३२ ने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास कामाचा कार्यादेश देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामामध्ये गैरव्यवहार झाली असल्याचे आढळून येत असल्याने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिनांक १८ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र व्यवहार करून माहिती मागविली असतांना अद्यापही माहिती उपलब्ध करून दिली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत असतानाही महानगरपालिका प्रशासन माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) पुणे महापालिकेमार्फत पोतदार स्कूल ते नवले पूल व आंबेगाव हद्दीवरील वडगाव ते कात्रज चौकापर्यंतच्या सर्व्हिस रस्त्याच्या कामाबाबत जानेवारी, २०२० मध्ये नाही, तथापि, नोव्हेंबर, २०१९ मध्ये सन्माननीय स्थानिक लोकप्रतिनिधींनी या कामासंदर्भात काही मुद्दयांची माहिती मिळावी म्हणून आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे.
(२) • प्रस्तुत कामासाठी रु.९९,९९,९६२.७२/- इतक्या अंदाजपत्रकास मान्यता दिलेली होती व या कामाची निविदा सन २०१८ मध्ये निविदा क्र.१५३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती.
• या कामाच्या रु.८९,०४,६३१/- एवढया रकमेच्या निविदेस स्थायी समितीने मान्यता दिलेली असून सदर कामाचे कार्यादेश दि.२८.०२.२०१९ रोजी देण्यात आलेले होते.
(३), (४) व (५) • प्रस्तुत प्रकरणी सन्माननीय स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.११.११.२०१९ रोजी पत्राद्वारे या निविदेसंदर्भात खालील ६ मुद्दयांची माहिती मागविली होती :-

१) कामाचे पूर्वगणनपत्रक,
२) झालेल्या कामाची बिल,
३) टेस्ट रिपोर्ट,
४) कन्सल्टंट (थर्ड पार्टी),
५) कामे मुदतीत न झाल्याने ठेकेदाराबरोबर झालेला पत्रव्यवहार,
६) काम मुदतीत न झाल्याची कारणमीमांसा.

• सदर माहिती पुणे महानगरपालिकेने दि.१२.०२.२०२० रोजी सन्माननीय स्थानिक लोकप्रतिनिधींना उपलब्ध करुन दिलेली आहे.
• माहिती उपलब्ध करुन देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कारवाई करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

-----------------

## केईएम रुग्णालयात (मुंबई) ईसीजी यंत्र बिघाडामुळे बालकाचा झालेला मृत्यू

**(५०) * २६२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केईएम रुग्णालयात (मुंबई) ईसीजी यंत्राच्या बिघाडामुळे कु.प्रिन्स राजभर या ३ महिन्याच्या बालरुग्णाचा दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास होरपळून मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयाच्या बालरोग विभागातील अतिदक्षता विभागात (PICU) प्रिन्स पन्हेलाल राजभर याला दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१९ रोजी अत्यंत गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले होते. सदर बालरुग्णावर तातडीने उपचार सुरु करुन त्यास वेन्टीलेटरवर ठेवण्यात आले होते.

दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१९ रोजी बालरुग्णाला लावलेल्या मल्टीपॅरामॉनिटरच्या केबलमधून आग लागल्याने बालरुग्णाचा डावा हात, खांदा व कान भाजला होता. दोन आठवड्याच्या उपचारानंतर दिनांक २२.११.२०१९ रोजी बालरुग्णाचा दुर्देवी मृत्यू झाला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी भोईवाडा पोलीस ठाणे येथे दिनांक १३.११.२०१९ रोजी प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करण्यात आला असून, भोईवाडा पोलीस ठाणेमार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच सदर दुर्घटनेची चौकशी करण्याकरिता संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये) व मुख्य अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांची द्विसदस्यीय समिती दिनांक ११.११.२०१९ रोजी गठीत करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

याशिवाय, सदर प्रकरणाची नि:पक्ष सखोल चौकशी करण्याकरीता दिनांक १२.१२.२०१९ रोजी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई यांचेमार्फत घटनेशी संबंधित क्षेत्रातील तज्ञ जसे- बालरोग तज्ञ, एन.आय.सी.यू. तज्ञ, बायोटेक इंजिनिअर, इलेक्ट्रीकल इंजिनिअर इत्यादींचा समावेश असलेली एकूण ६ सदस्यांची समिती अधिक्षक, सर जे.जे. रुग्णालय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे.

-----------------

## अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील (जि.ठाणे) भुयारी गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५१) * १०२२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील (जि.ठाणे) भुयारी गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून निविदेत ठरवून दिलेल्या वेळेत काम केले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील भुयारी गटार योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर व सदर कंपनीला पाठीशी घालणाऱ्या सबंधित नगरपरिषद प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत अंबरनाथ शहराच्या रुपये ६८.११ कोटी किंमतीच्या मलनिस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• सदर प्रकल्पाचे काम माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत ८५ टक्के पूर्ण झालेले असून सद्यस्थितीस प्रकल्पाचे काम ९३ टक्के पूर्ण झालेले आहे.

• सदर प्रकल्पाचे उर्वरित काम मार्च, २०२० अखेर पूर्ण करण्याचे अंबरनाथ नगरपरिषदेचे नियोजन आहे.

• सदर प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले नसल्याबाबत अंबरनाथ नगरपरिषदेने कळविले आहे.

-----------------

## गुहागर नगरपंचायतीतील (जि.रत्नागिरी) १४ व्या वित्त आयोग योजनेतील कामे ही नगरपंचायतीच्या मालकीच्या जमिनीमध्ये नसल्याबाबत

**(५२) * २८४८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर नगरपंचायतीने (जि.रत्नागिरी) १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गतच्या ४१ कामांची निविदा दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १४ व्या वित्त आयोग योजनेतील कामे ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जमिनीमध्ये असावीत असा नियम असताना सदर ४१ पैकी ३२ कामे ही नगरपंचायतीच्या मालकीच्या जागेत नसल्याची माहिती मुख्याधिकारी, नगरपंचायत, गुहागर यांनीच दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अर्जदार श्री.जयदेव मुरलीधर मोरे (रा.गुहागर) यांना माहितीच्या अधिकाराखालील माहितीमध्ये दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्पूर्वी दिनांक २३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास सदर कामांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे सादर करताना मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनी ज्या जमिनीवर

कामे आहेत ती जमीन नगरपंचायतीच्या मालकीची असल्याचे प्रमाणपत्र जोडून शासनाची दिशाभूल व फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खोटे प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याप्रकरणाची गांभीर्याने दखल घेवून संबंधितांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) गुहागर नगरपंचायत हद्दीत १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गत करावयाच्या "रस्ते, पाखाडी, गटार आणि संरक्षण भिंत" अशा ४१ कामांची निविदा दि.०२/११/२०१८ रोजी प्रसिध्द केल्याची वस्तुस्थिती नगरपंचायतीने कळविली आहे.

(२) उक्त कामांपैकी २४ कामांच्या जागा ह्या नगरपंचायत मालकीच्या असल्याची कागदपत्रे उपलब्ध नसल्याची बाब माहिती अधिकारांतर्गत अर्जदारास कळविल्याचे नगरपंचायतीने अहवालात नमूद केले आहे.

(३) व (४) अशा आशयाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सत्वर सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा ते मोताळा रस्त्यावरील मौजे शेंबा व खैरा (जि.बुलढाणा) येथील पुलाची उंची व रुंदी वाढविणे व रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(५३) * २२४० श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा ते मोताळा (जि.बुलढाणा) रस्त्यावरील मौजे शेंबा व खैरा येथील पुलाची उंची व रुंदी अतिशय कमी असल्याने वाहतुकीस प्रचंड अडथळा निर्माण होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ व २९ ऑक्टोबर २०१९ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे कमी उंची असलेल्या सदर पुलावरुन पुराचे पाणी वाहून गेल्याने दोन दिवस वाहतूक बंद ठेवावी लागल्याने या रस्त्यावरुन सतत वाहतूक करणाऱ्या नागरिकांना प्रचंड गैरसोयीस सामोरे जावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नांदुरा ते मोताळा या रस्त्याचा बहुतांश डांबरी पृष्ठभाग उखडलेला असून सदर रस्ता खड्डेमय झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असल्याची बाब दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार नांदुरा-मोताळा रस्त्यावरील मौजे खैरा व शेंबा (जि.बुलढाणा) येथील पुलाची उंची व रुंदी वाढविण्याबाबत व नांदुरा ते मोताळा हा रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ऑक्टोबर, २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे अस्तित्वातील अरुंद व कमी उंचीच्या पुलावरुन वाहतुक करीत असतांना नागरिकांना गैरसोयीचे होत होते.

(३) हे खरे नाही, तथापी पावसाळयामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे डांबरी पृष्ठभागावर खड्डे पडलेले होते. सदर डांबरी खड्डे भरण्यात आलेले आहेत.

(४) नांदुरा ते मोताळा हा रस्ता हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजुर असून काम प्रगतीपथावर आहे. तसेच मौजे शेंबा व खैरा या ब्रिटीशकालीन कमी रुंदी व कमी उंचीच्या दोन्ही पुलांचे पुनर्बांधकाम निधी व निकष यांच्या अधीन राहुन पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मीरारोड (जि.ठाणे) येथील कनकीया भागातील सेव्हन इलेव्हन क्लबचे बांधकाम निष्कासित करुन सीआरझेडची व ना विकास क्षेत्राची जागा मोकळी करण्याबाबत

**(५४) * ४६८१ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरारोड (जि.ठाणे) येथील कनकीया भागातील नाविकास क्षेत्र, सीआरझेड, भरतीची उच्चतम रेषा, कांदळवनने बाधित असलेल्या जागेत पर्यावरणाचा ऱ्हास करुन बेकायदेशीर भराव करुन सेव्हन इलेव्हन क्लब उभारण्यात आला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू क्लबसाठी ३० ते ४५ मिटर हायवे असल्याचे दाखवून पर्यटन विकासासाठी जादा चटईक्षेत्र देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनधिकृत क्लबच्या बांधकामामुळे कांदळवन नष्ट होत असल्याबाबत अनेक तक्रारी जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून संबंधित विभागाला देण्यात आल्या असतानाही अद्याप या प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यटन विकासाबाबतच्या शासनाचे नियम गृहीत धरुन चुकीच्या आधारे शासनाने सेव्हन इलेव्हन क्लबला नियमांचे उल्लंघन करुन जादा एफ.एस.आय. देण्यात आल्याने या क्लबचे बांधकाम निष्कासित करुन सीआरझेडची जागा मोकळी करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मे/सेव्हन इलेव्हन प्रा.लि. यांनी मौजे नवघर, स.क्र.२६५/४, २६६/२,३,५,६, २६७/३ (जुना) ८१/४, ६७/२,३/५,६, ६७/३ (नविन) या मंजूर रेखांकनात मौजे नवघर, स. क्र. २६५/२, २६६/१,४ व २६७/२ (जुना) ८१/२, ६७/१,४ व ५२/२ (नविन) या जागा समाविष्ट करुन एकत्रित जागेत बांधकाम परवानगी मिळण्याचा प्रस्ताव सादर केल्यानंतर मिरा-भाईंदर

महानगरपालिकेने दि.१९/११/२०१५ रोजी बांधकाम परवानगी दिली असून, सुधारित बांधकाम परवानगी दि.१८/२/२०१७ रोजी दिली आहे. कांदळवन क्षेत्रात भराव केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द मिरा-रोड पोलीस स्टेशन येथे महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांनी एफ.आय.आर.दाखल केले आहेत. तसेच सदर बाबतीत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे.

(२) मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.५७(xiii)(ड) नुसार ३०-४५ मीटर रुंद रस्त्यावर ३०.०० मीटर खोलीपर्यंत ना-विकास क्षेत्रात रहिवासी वापर अनुज्ञेय आहे. मे. सेव्हन इलेव्हन हॉटेल्स प्रा.लि. यांनी उक्त तरतुदीनुसार सदर जागेवर हॉटेलचे बांधकाम अनुज्ञेय करण्याची विनंती केली होती. विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.५१(७)(vii) मधिल तरतूदीनुसार रहिवास वापर विभागात हॉटेल बांधकाम अनुज्ञेय आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना अर्जदाराचा प्रस्ताव मान्य करण्यात येत असल्याचे कळविले आहे. सदरहू क्लबसाठी ३० ते ४५ मीटर हायवे असल्याचे दाखवून अथवा पर्यटन विकासासाठी जादा चटई क्षेत्रास शासनाने मंजूरी दिलेली नाही.

(३) सदर क्लबच्या बांधकामाबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रार अर्जांवर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना शासनाने कळविले आहे. तसेच दि.०६.०१.२०२० च्या पत्रान्वये प्रकरणातील सदय:स्थितीची सविस्तर माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून मागविण्यात आली आहे.

(४) शासनाने सेव्हन इलेव्हन क्लबला अर्जदारांच्या प्रस्तावानुसार मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार मान्यता दिलेली असून नियमाचे उल्लंघन करुन ज्यादा एफ. एस. आय. देण्यात आलेला नाही. तसेच प्रश्नांकित जागेबाबत महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या फेरबदल प्रस्तावावर शासनाने दि.६/१/२०२० च्या पत्राने प्रकरणातील सद्यस्थितीची सविस्तर माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून मागविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यावर त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याची शासनाची भूमीका आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदपूर (जि.लातूर) शहराला पाणीपुरवठा करण्याबाबत

**(५५) * ७६९ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी लिंबोटी प्रकल्पावरील शासनाच्या पाणीपुरवठा योजनेचे ४३ कोटी रुपयांचे काम सुरु होऊन दोन वर्षाचा कालावधी झाला असून तेथील अनेक कामे अजूनही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदपूर तालुक्यात सर्वाधिक पाऊस पडल्याने लिंबोटी प्रकल्प १०० टक्के भरला आहे मात्र तेथील महानगरपालिकेच्या उदासिन कारभारामुळे शहरात अनियमित पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम संथ गतीने होण्याचे कारण काय आहे व सदर कामाचे ठेकेदार कोण आहेत, तसेच काम किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी व तेथील शहरातील नागरीकांना नियमित पाणीपुरवठा होणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रुपये ४४.५२ कोटी किंमतीच्या अहमदपूर शहर पाणीपुरवठा प्रकल्पास शासनाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

• आतापर्यंत सदर प्रकल्पाचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(२) • अहमदपूर शहरासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे तसेच जुन्या योजनेतील वितरण व्यवस्थेतील त्रुटी जसे की पंपिंग मशिनरी मध्ये होणारा बिघाड, जलवाहिनी फुटणे, विद्युत पुरवठ्यात होणारा खंड आणि शहरातील वाढलेली लोकसंख्या यामुळे लिंबोटी प्रकल्प १०० टक्के भरलेला असताना सुद्धा १५ ते २५ दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) • अहमदपूर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाचे कार्यादेश मे.आर.जी. सानप कन्स्ट्रक्शन कंपनी, नांदेड यांना देण्यात आलेले आहेत.

• सदर प्रकल्पाचे काम करताना धरणाच्या लगतची विद्युत पॅनेल व इतर बाबींसाठी लागणारी जागा खाजगी मालकीची असल्यामुळे जमीनधारकांची संमती मिळण्यास वेळ लागल्यामुळे, तसेच अशुद्ध पाणी उद्धरण नलिकेचे काम शेतकऱ्यांनी काही काळ अडविले असल्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या समुपदेशनाअंती कामे करून घेण्यास विलंब झालेला आहे.

• सदर प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर, २०२० पूर्वी पूर्ण करून दररोज नियमित पाणीपुरवठा करण्याचे अहमदपूर नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(४) व (५) • सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. तसेच प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण व्हावे याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वेळोवेळी तपासणी केलेली आहे.

• तसेच सदर प्रकल्पाच्या कामास होणाऱ्या विलंबामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे प्रस्तावित केल्याप्रमाणे कंत्राटदाराविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत रुपये १०,७०,८५५/- इतकी रक्कम दंडापोटी कपात करण्यात आलेली आहे.

• तसेच या प्रकल्पाच्या कामाचा नियमित आढावा घेऊन प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर, २०२० पूर्वी पूर्ण करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

-----------------

## भांडूप (मुंबई) येथील महानगरपालिकेतर्फे उभारण्यात येणाऱ्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाबाबत

**(५६) * १६८० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (मुंबई) येथील ३६० खाटांचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर रुग्णालय सर्वसामान्यांच्या दृष्टिने महत्वाचे असल्याने सदरहू रुग्णालयाचे काम त्वरीत पुर्ण करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेस मौजे नाहूर येथे औद्योगिक क्षेत्रात वसलेल्या भूखंडावर निवासी वापर अनुज्ञेय करतांना विकासकाकडून १८,७६५.३० चौ.मी. चा "सुविधा भूखंड" प्राप्त झाला होता.

सदर भूखंडावर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने दिनांक २७.०७.२०१३ रोजी आदेश दिले होते.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कामासाठी दिनांक ०८.१०.२०१३ व दिनांक १०.१०.२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुक सल्लागारांकडून "स्वारस्याची अभिरुची" मागविण्यात आली होती. परंतु एकही सल्लागार पात्र झाला नाही.

तद्नंतर दिनांक १०.०७.२०१४ रोजी दिलेल्या जाहिरातीमधील पात्र सल्लागारांपैकी लघुतम देकार असलेल्या सल्लागाराची नियुक्ती करुन दिनांक १६.१०.२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

दरम्यानच्या काळात विकासक यांनी सदर जमिनीवरील रस्त्याचे क्षेत्रफळ सुविधा भूखंडामध्ये समायोजित करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक १८८५/२०१४ दाखल केली.

सदर याचिकेमधील मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सुविधा भूखंडामधून ८२०९.३० चौ.मी. चा भूखंड विकासकास परत करण्यात आला.

तद्नंतर, विकासकाने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील समायोजन तरतुदीनुसार समायोजन आरक्षणांतर्गत ८२०९.३० चौ.मी. चा भूखंडाचा विकास करण्यास परवानगी मागितली. सदर परवानगी देताना महानगरपालिकेस दिनांक २०.०३.२०१९ रोजी ४०% भूखंड प्राप्त झाला आहे.

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रुग्णालयाकरिता १६,३६८ चौ.मी. इतका भूखंड उपलब्ध असून, सदर भूखंडावर आवश्यकतेनुसार नियोजित ३६० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याकरिता सल्लागाराकडून महानगरपालिकेस माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये आराखडे प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार सदर आराखड्यास प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे. तसेच सल्लागामार्फत मसुदा निविदा बनविण्याचे काम सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## कुर्ला-अंधेरी (मुंबई उपनगर) येथील ७० फुट रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(५७) * ८७६ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला-अंधेरी (मुंबई उपनगर) हा ७० फूट प्रस्तावित रस्ता मागील अनेक वर्ष रुंदीकरणाच्या प्रतिक्षेत असल्याने प्रचंड वाहतूक कोंडी होत असून स्थानिक लोकप्रतिनिधिनी वारंवार पाठपुरावा करुन देखील अद्यापपर्यंत रस्ता अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्ता अंधेरीसह साकीनाका, सफेद पुल जरीमरी आणि कुर्ला अंधेरी लिंक रस्त्याला जोडतो तसेच मुंबई छत्रपती शिवाजी महाराज विमानतळाला देखील जोडण्यात आला असून हा अति महत्वाचा मार्ग असल्याने कुर्ला-अंधेरी रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागामध्ये कुर्ला-अंधेरी रस्त्याची लांबी ४ कि.मी. असून रुंदी ९० फुट आहे.

सदर रस्त्याच्या नियोजित रस्तारेषामधील ३४ बाधीत बांधकामांपैकी ३१ बांधकामे निष्कासित करण्यात आली असून ३ बांधकामांमध्ये मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत.

सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील कुर्ला-अंधेरी रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “एल” विभागाच्या हद्दीतील कुर्ला-अंधेरी रस्त्याची लांबी २.७ कि.मी. असून, रुंदी ७० फुट आहे.

सदर रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत साकीनाका, सफेदपुल, जरीमरी या रस्त्यांलगत असलेल्या बांधकामांची पात्रता निश्चित करुन अपात्र बांधकामांचे महानगरपालिकेमार्फत निष्कासन करण्यात येत आहे. तसेच पात्र बांधकामधारकांच्या पुनर्वसनाचे काम महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेसाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीच्या ॲपेंडिक्स-डब्ल्यु मधील तरतूदींचे उल्लंघन झाले असल्याबाबत

**(५८) * ४२३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील डोंबिवली मौजे गावदेवी येथील स.नं. ३५० अ (जुना), ३२ (नविन) या जमिनीवरील आरक्षित जमिनीचा नियमबाह्य हस्तांतरणीय विकास हक्क महानगरपालिकेने प्रदान केला असुन यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीच्या ॲपेंडिक्स-डब्ल्यु मधील तरतूदींचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून आल्याने या प्रकरणामध्ये समाविष्ट कर्मचारी/अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरु करण्यापुर्वी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नगर रचना संचालनालयाच्या संबंधित अधिकारी यांचेवर कायवाई होऊन त्यांचेवर दोषारोप बजावण्यात आले आहे व प्रादेशिक

विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग यांची चौकशी अधिकारी म्हणुन दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास नियुक्ती करण्यात आली असताना अद्याप संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भारतीय प्रशासन सेवेमधील अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कर्मचारी/अधिकारी यांच्यावर किती कालावधीत निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने मौजे गावदेवी, ठाकुर्ली स.नं.३५०अ (जुना), ३२ (नविन) ही जमिन खाजगी जमिन विचारात घेऊन या जमिनीपैकी विविध आरक्षणाने बाधित ८८२२.७० चौ.मी. क्षेत्राचे हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान केलेले आहेत. सदरहू प्रकरणामध्ये ७/१२ उताऱ्यावरील नोंदीमध्ये केलेल्या खाडाखोडीबाबत महसुल विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(२) सदर प्रकरणामध्ये सादर केलेल्या महसुल विभागाकडील मालकी हक्काच्या प्राप्त कागदपत्रांच्या अनुषंगाने हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान करण्यात आले असून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही महानगरपालिकेचे स्तरावर सुरु आहे.
(३) सदर प्रकरणांमध्ये समाविष्ट असलेल्या नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम-८ खाली विभागीय चौकशी सुरु करण्याकरीता दोषारोपपत्रे तयार करुन शासन मान्यतेसाठी सादर करण्याबाबत संचालक, नगर रचना व मुल्यानिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले आहे.
(४) या प्रकरणामध्ये जबाबदार असलेल्या तत्कालिन आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यापूर्वी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याबाबत सामान्य प्रशासन विभागास कळविले आहे.

तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल (एचएएम) योजनेतील सिंहगड-पानशेत रस्त्याच्या कामामध्ये गैरप्रकार सुरु असल्याबाबत

**(५९) * १०८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथिल हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल (एचएएम) योजनेतील सिंहगड-पानशेत रस्त्याच्या कामामध्ये गैरप्रकार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रश्नी कामांचा दर्जा आणि गुणवत्ता-नियोजन याविषयी मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना जा.क्र.७८२, दि. ०७/११/२०१९ आणि जा.क्र.११०७, दि. २७/१२/२०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रव्यवहार केला असता, त्याबाबत बैठका घेतल्या असता अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम करीत असतांना मुख्य निवेदनातील नियोजनानुसार कामे न करता ठिकठिकाणी कंत्राटदाराच्या सोयीनुसार बदल करून मंजुरीशिवाय कामे सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित प्रशासन ठेकेदाराच्या हितासाठी काम करीत असतांना या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) नाही.
(२) शहरी भागातील रस्त्यांची कामे प्राधान्याने करणेबाबत व कामाचा वेग वाढविणेबाबत कंत्राटदारास सूचना देऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच विनिर्देशाप्रमाणे कामाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यात येत आहे.
(३) व (४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मुरुगवाडा-पंधरामाड-पांढरा समुद्र ते मि-या या भागात टेट्रापॉड व ग्रोयनचा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

**(६०) * ३०२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील रत्नागिरी शहरालगत असणाऱ्या मुरुगवाडा-पंधरामाड-पांढरा समुद्र ते मिऱ्या या भागात सुमारे साडेतीन कि.मी. लांबीचा टेट्रापॉड व ग्रोयनचा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या अंदाजित रुपये १८७.६७ कोटीच्या रक्कमेस शासनाने दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू टेट्रापॉड व ग्रोयनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या कामास अद्यापही प्रत्यक्षात सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कामास अद्यापही सुरुवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, सदरहू टेट्रापॉड व ग्रोयनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात करण्यात येणार व हे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू टेट्रापॉड व ग्रोयनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) होय.

(३) व (४) सदर कामासाठी मुख्य अभियंता, सा. बा. प्रादेशिक विभाग मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६/०४/२०१९ रोजी सुकाणू समिती गठीत करण्यात आल्यानुसार Terms Of Referance (TOR) ला मंजुरी दि.११/०६/२०१९ रोजी देण्यात आली. सल्लागार नेमणूकीची प्रथम निविदा दि.१३/०६/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. परंतु निवीदेस प्रतिसाद न मिळाल्याने पुनश्च: निविदा दि.१६/०७/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. प्राप्त न्युनतम निविदा दि.१३/०१/२०२० रोजी मंजुर करण्यात आली असून सदर सल्लागारास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर कामासाठी D.P.R./सागरी किनारा क्षेत्र (CRZ) व इतर विभागाकडून विविध आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावांमध्ये पाणी टंचाई असल्याबाबत

**(६१) * १०२४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावांमधे पाणी टंचाई निर्माण झाली असून वेळोवेळी याबाबत बैठका घेऊनसुद्धा पिण्याचा पाण्यापासून गावांना वंचित राहावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७ गावातील रहिवाश्यांना सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक प्रशासनाने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार २७ गावातील रहिवाश्यांना सुरळीत व पुरेसा पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील समाविष्ट २७ गावांसाठी एकूण ५५ द.ल.ली. पाण्याची आवश्यकता असून सद्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ५० द.ल.ली. इतका पाणीपुरवठा करण्यात येतो.
• यापुर्वी २७ गावांमध्ये योग्य त्या नळजोडण्या नसल्याने सर्वत्र समप्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी अडचणी येत होत्या.
• तत्कालीन मा.पालकमंत्री यांचेकडे दि.०२.०८.२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार २७ गावातील काही भागात १५० मी.मी. व्यासाच्या ३ नवीन नळजोडण्या सुरु करण्यात आलेल्या आहेत, उपलब्ध असलेल्या ४३ नळजोडण्यांपैकी १६ नळजोडण्यांचा आकार वाढविण्यात आलेला आहे. ४ नवीन नळजोडण्या घेण्यात आल्या असून ५ नळजोडण्या स्थलांतरीत करण्यात आलेल्या आहेत. यामुळे सद्यस्थितीत २७ गावांच्या पाणी पुरवठ्यात सुधारणा झालेली आहे.
• २७ गावातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच रहिवाश्यांकडून महानगरपालिका तसेच शासनाकडे मागणी करण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे.
• केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत २७ गावांसाठी रू.१८०.८१ कोटी किंमतीची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आलेली आहे.
• सदर योजनेमध्ये २१ कि.मी. उर्ध्ववाहिनी, १७ कि.मी. लांबीची गुरूत्ववाहिनी, २८ जलकुंभ व २२३ कि.मी. वितरण व्यवस्थेचा प्रामुख्याने समावेश आहे.

• सदर प्रकल्पाच्या कामास दि. १८.०९.२०१९ रोजी सुरूवात करण्यात आली असून, ते २ वर्षात पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारूळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) आदी गावांत लाटांच्या पाण्याने होत असलेले नुकसान

**(६२) * २०२८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारुळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ (ता.गुहागर) आदी गावांत गत ३ वर्षापासून वारंवार लाटांचे पाणी लोकवस्तीत शिरल्याने घरे व नारळी पोफळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले तसेच येथील रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील जिंदाल कंपनीने बांधलेल्या ब्रेकवॉटर वॉलमुळे लाटांची उंची वाढली असून त्यामुळे पाणी लोकवस्तीत शिरते असे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ तसेच दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार करून चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र, खडकवासला, पुणे यांचेमार्फत अभ्यास होवून त्यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या अहवालात ब्रेकवॉटर वॉलमुळेच लाटांची उंची वाढून पाणी लोकवस्तीमध्ये जात असल्याचा निष्कर्ष काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालानंतर सदर कंपनीविरोधात व याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय. अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांच्या दि.८.८.२०१८ च्या अहवालानुसार १३ ते १७ जुलै, २०१८ च्या कालावधीत लोकवस्तीत शिरलेले पाणी हे ब्रेकवॉटर वॉलमुळेच शिरले आहे, याचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून अधिकची माहिती आवश्यक आहे. तद्नुसार व्यवस्थापक,जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून प्राप्त माहिती केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे घोडबंदर (जि.ठाणे) येथे सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेला अपना घर प्रकल्प

**(६३) * ४६८२ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे घोडबंदर (जि.ठाणे) येथे सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या अपना घर प्रकल्पामध्ये सदर कंपनीस महसूल विभागाने ७९ कोटी ४२ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला दंड भरेपर्यंत स्थगितीची नोटीस दिली असताना बांधकाम सुरु करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मौजे घोडबंदर येथील स.नं.२५/२, १११/१/१, १/२, ११२/१ या जागेवर मातीचा अनधिकृत भराव तसेच दगडाचा साठा केल्याबाबत तहसिलदार, ठाणे यांनी सेव्हन इलेव्हन या बांधकाम कंपनीस रु.७९,४२,४२,८००/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दि.३०/९/२०१६ रोजी पारीत केले होते. सदर आदेशाविरुध्द संबंधित कंपनीने उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे अपिल दाखल केले असता उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि.४/१०/२०१७ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार, ठाणे यांचे दि.३०/९/२०१६ रोजीचे आदेश रद्द करणेत आले असून या प्रकरणामध्ये तहसिलदार, ठाणे यांना फेरचौकशी करण्याचे आदेश देणेत आले आहेत. याबाबत तहसिलदार, ठाणे (सध्या अपर तहसिलदार, मीरा-भाईंदर) यांचे स्तरावर प्रकरणामध्ये नोटीस देवून सुनावणी दि.१३/०३/२०२० रोजी निश्चित केली आहे.

सदर प्रकल्पाच्या १६४३४.९९ चौ.मी. क्षेत्राकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली असून एकूण बांधकाम क्षेत्र २०,००० चौ.मी.च्या मर्यादेत असल्याने सदर प्रकल्पास शासन धोरणानुसार पर्यावरण विभागाच्या परवानगीची आवश्यकता नसल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकल्पाला दंड भरेपर्यंत स्थगितीची नोटीस दिली असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## लातूर शहरातील व्यापारी व उद्योजकांनी कोट्यवधी रुपयांचा महानगरपालिकेचा कर थकविल्याबाबत

**(६४) * ७७६ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरातील व्यापारी व उद्योजकांकडे कोटयवधी रुपयांचा कर थकित असून मुदत देवूनही कराचा भरणा केलेला नसल्याने सदर प्रकरणी कायद्यानुसार कारवाई केली जाणार असून उक्त प्रकरणी दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल अशी माहिती आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यापारी व उद्योजकांकडे ८० कोटी रुपयांची कराची थकबाकी असल्याने तेथील प्रशासनावर मोठया प्रमाणात आर्थिक ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मालमत्ता कर वसुलीबाबत लातूर येथील एमआयडीसी व एपीएमसी मधील उद्योजक/व्यापारी यांची संयुक्त बैठक आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी दिनांक १८.१२.२०१९ रोजी घेतली आहे, हे खरे आहे.

(२) संबंधित व्यापारी/उद्योजकांकडे महानगरपालिकेची मालमत्ता कराची रुपये ८०.२८ कोटी इतकी थकबाकी असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) • आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी एमआयडीसी व एपीएमसी मधील व्यापारी/ उद्योजकांच्या बैठका घेऊनही संबंधितांनी मालमत्ता कर भरण्यास सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही.

• त्यामुळे संबंधित व्यापारी व उद्योजकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक कारवाई प्रस्तावित असल्याचे लातूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.